**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २८९/२०११.**

श्री. राधेश्याम परसरामजी काबरा,
शिवाजी वार्ड, ता. देसाईगंज (वडसा),
जि. गडचिरोली - ४४१ २०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. डी. बडकेलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
गडचिरोली.

श्री. एस. टी. गोहणे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांचे कार्यालयाकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन अपीलकर्त्याने दिनांक ५.१.२००९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जालील

... २

केलेल्या कार्यवाहीबाबत एकूण १५ मुद्यांची माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.९.२०१० च्या पत्राने उत्तर पाठविले असून त्यामध्ये असे नमुद केले की, मुद्या क्रमांक १ ते ३ बाबत माहिती उपलब्ध नाही. मुद्या क्रमांक ४ बाबत दिनांक ३०.१.२००९ च्या पत्राची प्रत आपणास पुरविण्यात येत आहे. मुद्या क्रमांक ५ ते १५ बाबत विचारलेली माहिती प्रश्नार्थक, विश्लेषणात्मक व कर्मचाऱ्यांचे विरुध्द कार्यवाही संबंधित असल्यामुळे या कार्यालयाकडून पुरविता येत नाही असे कळविलेले होते. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे दिनांक २८.९.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेऊन दिनांक ८.११.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला व त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्रमांक १ ते १५ ची उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती आदेश प्राप्तीचे दिनांकापासून ७ दिवसांचे आंत अर्जदारास प्रत्यक्ष कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत बोलावून त्यांना आवश्यक असलेले दस्तऐवज तपासणीसाठी देऊन त्याच्या प्रती अर्जदारास विनामुल्य पुरविण्याबाबत निर्णय दिला होता. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३१.१२.२०१० च्या पत्राने १ ते १५ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

३. वास्तविक पाहता तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे निर्णयानंतर ७ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. प्रथम अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ८.११.२०१० रोजी दिलेला आहे व सदरचा निर्णय जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दिनांक १५.११.२०१० रोजी प्राप्त झालेला आहे. म्हणजे दिनांक १५.११.२०१० पासून ७ दिवस मुदत म्हणजे दिनांक २२.११.२०१० पर्यंत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मात्र तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी अपीलकर्त्यास दिनांक २१.१२.२०१० च्या पत्राने विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून या विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज हे जबाबदार दिसून येतात.

... ३

म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये त्यांचेवर रुपये ५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगापुढे करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी प्रथम अपीलाचे निर्णयानंतर वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्तीची कार्यवाही कां करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचें आंत आयोगाकडे सादर करावा.

३) सदरच्या आदेशाची प्रत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडे खुलास्यासाठी पाठवावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४२२-४२४/२.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९०/२०११.

श्री. राधेश्याम परसरामजी काबरा,
शिवाजी वार्ड, ता. देसाईगंज (वडसा),
जि. गडचिरोली - ४४१ २०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. डी. बडकेलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
गडचिरोली.

श्री. एस. टी. गोहणे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जात अपीलकर्त्याने दिनांक ३०.६.२०१० रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाही संदर्भात एकूण १३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा

... २

उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी अपीलकर्त्यास दिनांक १७.९.२०१० रोजी पत्र पाठवून असे कळविले की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत आपण आपला दिनांक ३०.६.२०१० रोजी केलेला तक्रार अर्जावरील झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली आहे. त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपला दिनांक ३०.६.२०१० च्या तक्रार अर्जावर चौकशी चालू आहे. आपल्या अर्जावर कोणी मार्कींग केली यासाठी आपल्या अर्जाची प्रत यासोबत जोडण्यात येत आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिली असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

३. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे दिनांक ११.१०.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. परंतु त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. जनमाहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.११.२०१० रोजी देण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २३.८.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन मुद्या क्रमांक ४ ते १३ मुद्यांची माहिती १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपीलकर्त्यास प्रत्यक्ष कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत बोलावून त्यांना आवश्यक असलेले दस्ताऐवज तपासणीसाठी देऊन त्याच्या प्रती अपीलकर्त्यास विनामुल्य पुरविण्यात याव्यात असाही आदेश प्रथम अपीलाचे निर्णयात दिलेला होता. प्रथम अपीलाचे निर्णयाचे अनुषंगाने विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३०.११.२०१० च्या पत्राने असे कळविले की, प्रथम अपीलाचे आदेशाप्रमाणे अपीलकर्त्यास उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांचे कार्यालयात (नझूल शाखा) दिनांक ४.१२.२०१० ला कार्यालयीन वेळेत दस्तऐवज तपासणीसाठी हजर राहावे व आवश्यक असलेल्या दस्तऐवजांच्या प्रती प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले दिसते. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २२.१२.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ४ ते १३ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

४. वास्तविक पाहता प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.११.२०१० रोजी देण्यात आला होता व सदरच्या

... ३

निर्णयात प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त झाल्या पासून १० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश होते. तथापी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २२.१२.२०१० च्या पत्राने मुद्या क्रमांक ४ ते १३ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. म्हणजे सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणजे सदरच्या विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्तीची कार्यवाही कां करु नये याचा त्यांनी आयोगापुढे खुलासा करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्या प्रमाणे विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्तीची कार्यवाही कां करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचें आंत आयोगाकडे सादर करावा.

३) विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी सदरच्या निर्णयाची एक प्रत तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेकडे खुलास्यासाठी पाठवावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४२५-४२७/२.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९२/२०११.

श्री. अभयकुमार एम. कुथे,
विराज अपार्टमेंट, प्लॉट नं. १२,
सुरेंद्रनगर, नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त,
परिमंडळ - २,
अमरावती शहर, अमरावती.

श्री. एस. टी. महाजन,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
राजापेठ विभाग, अमरावती शहर,
अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २६.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग, अमरावती शहर, अमरावती यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन अपीलकर्त्याने दिनांक १६.८.२०१० रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भातील

... २

माहिती मागितलेली होती. त्यामध्ये धारिकेतील टिपणीची प्रत, चौकशी अहवालाची प्रत, तसेच तक्रारीच्या संदर्भात घेतलेल्या बयाणाच्या प्रमाणित प्रती इत्यादी माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २९.१२.२०१० रोजी पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रमांक २, अमरावती शहर, अमरावती यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.१.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये अपीलकर्त्यास सर्व कागदपत्रे प्रमाणित करुन विनामुल्य पुरविण्याचे आदेश झाले. तथापी त्यानंतरही त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे स्वाक्षरीने प्रमाणित प्रती मिळाल्या नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले व जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने सुनावणीत आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २६.१०.२०१० चा माहितीचा अर्ज दिनांक २८.१०.२०१० रोजी त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. दिनांक २८.१०.२०१० रोजीचा माहिती अधिकाराखालील अर्ज हा इंग्रजीमध्ये असल्याने अर्जातील माहितीचे विवरण कृपया मराठीत करावे असे अपीलकर्त्यास दिनांक ११.११.२०१० रोजी कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने दिनांक २३.११.२०१० रोजी मराठीत अर्ज पाठविला. सदरचा अर्ज दिनांक २९.११.२०१० रोजी त्यांचेकडे प्राप्त झाला. मात्र सदरच्या अर्ज मराठीत मुद्येसुद नव्हता. म्हणून अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक २३.१२.२०१० च्या पत्राने पाहिजे असलेल्या माहिती संदर्भात मुद्येसुद कळवावे असे कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक १९.१.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र त्यांना सदरच्या माहितीमध्ये धारिकेची टिपणीची प्रत तसेच त्यांच्या अर्जासंबंधात केलेल्या चौकशी अहवालाची प्रत व घेतलेले ४ बयाणाच्या प्रती जनमाहिती अधिकारी यांचे स्वाक्षरीने प्रमाणित प्रती अद्याप

मिळालेल्या नाही असे त्यांनी नमुद केले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील पोलीस उपआयुक्त, अमरावती यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २७.१.२०११ रोजी ठेवण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.१.२०१० रोजी देण्यात आला. त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेली सर्व कागदपत्रे प्रमाणित करुन विनामुल्य जनमाहिती अधिकारी यांनी पुरवावी असा प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित केला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने दिनांक २६.१०.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग, अमरावती यांचेकडे माहिती मागितलेली होती. सदरचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २८.१०.२०१० रोजी प्राप्त झाला होता. सदरचा माहितीचा अर्ज इंग्रजीत असल्यामुळे त्या अर्जाचे भाषांतर करुन अपीलकर्त्यास दिनांक २३.११.२०१० रोजीच्या पत्राने मराठीत मागितलेल्या माहितीचे विवरण जनमाहिती अधिकारी यांचे पाठविले होते. त्यानंतरही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १९.१.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्याबद्यल जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांना खुलासा विचारला असता त्यांनी असा खुलासा केला की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त करुन घेण्यास कालावधी लागला म्हणून माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी त्यांचे कार्यालयातील धारिकेमध्ये कोणतीही कार्यालयीन टिपणी तयार केलेली नाही. तसेच अपीलकर्त्याचे अर्जाचे संदर्भात चौकशी अहवाल तयार केलेला नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. त्याचप्रमाणे बयाणाच्या ४ ही प्रती जनमाहिती अधिकारी यांनी प्रमाणित करुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात मुद्दा क्रमांक १ बाबत धारिकेमध्ये कार्यालयीन टिपणीची प्रत तयार केलेली नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

२) तसेच अपीलकर्त्याचे तक्रार अर्जाचे संदर्भात चौकशी अहवाल तयार केलेला नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे. त्याचप्रमाणे घेतलेल्या ४ बयाणाच्या प्रती जनमाहिती अधिकारी यांनी प्रमाणित करुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्याव्यात. वर नमुद केलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी.

३) अपीलकर्त्याच्या दिनांक २६.१०.२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दिनांक २८.१०.२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १९.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी हे दोषी दिसून येतात. तसेच विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही म्हणून जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

४) सदरच्या शास्तीची रक्कम पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रमांक २, अमरावती शहर, अमरावती यांनी वसूल करावयाची आहे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९६/२०११.**

श्री. भोजराज बाबुलाल मेश्राम,
मु. पिंडकेपार, पो. पाथरी,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. एस. शिंदे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भुमी अभिलेख, जि. गोंदिया.

श्री. एस. जी. थॉमस,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअधिक्षक,
भुमी अभिलेख कार्यालय,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १९.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भुमी अभिलेख, गोरेगांव यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मौजा पिंडकेपार येथील जमीनीचे एकत्रिकरण हिस्सा नंबर ४, पी-१, सिमांकन नकाशा, बदोबस्त नकाशा इत्यादी

... २

बाबतच्या प्रती मागितलेल्या होत्या. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. मात्र प्रथम अपीलानंतर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीचे शुल्क रुपये ५५०/- भरणेबाबत कळविले. तथापी ते दारिद्रयरेषेखालील असल्यामुळे माहिती अधिकारान्वये त्यांना मोफत माहिती मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्यांना मोफत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १९.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २२.११.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने माहिती अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीमध्ये मौजा पिंडकेपार येथील जमीनीचे भूमापन क्रमांक किंवा गट नंबर किंवा खसरा नंबर नमुद केलेला नाही म्हणून नेमक्या कोणत्या नंबरची माहिती पाहिजे या संबंधात अपीलकर्त्यास दिनांक १५.१२.२०१० रोजी पत्र लिहून कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख यांचेकडे दिनांक १७.१.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ७.२.२०१० रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.२.२०१० रोजी निर्गमित करण्यात आला व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्याने मागणी केलेल्या माहितीची फी चा भरणा करुन नकला प्राप्त करुन घ्याव्यात. त्याच प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, शासनाच्या भुमी अभिलेख विभागाने यापुर्वी सार्वजनिक दस्ताऐवज म्हणून जाहीर करुन त्यांची फी निर्धारित केलेली आहे ती फी मात्र अपीलकर्त्यास भरावी लागेल.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकाराखाली मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जी माहिती भुमी अभिलेख विभागाने सार्वजनिक दस्तऐवज म्हणून जाहिर केलेले आहे त्याची फी अपीलकर्त्याने भरणे आवश्यक असल्याचे दिसून येते व त्या सार्वजनिक दस्ताऐवजाची फी भरण्यास अपीलकर्त्याने सुनावणीत

आयोगासमोर मान्य केले. तथापी भुमी अभिलेख विभागाने जे दस्ताऐवज सार्वजनिक दस्ताऐवज म्हणून जाहिर केलेले नाही ते दस्तऐवज अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास भुमी अभिलेख विभागाने जे दस्ताऐवज सार्वजनिक दस्ताऐवज म्हणून जाहिर केलेले आहे त्याची फी अपीलकर्त्याकडून भरुन घेऊन त्या सार्वजनिक दस्ताऐवजांच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्याव्यात. मात्र जे दस्ताऐवज सार्वजनिक दस्ताऐवज म्हणून जाहिर केले नाही त्याच्या प्रती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४३२-४३४/३.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९७/२०११.**

श्री. निलकंठ लक्ष्मण सोनटक्के,
मु. कमरगांव, पो. मोहाडी,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रा. गो. राऊत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हानिबंधक वर्ग-१ (निम्मश्रेणी)/ मुद्रांक
पेठकर इमारत, संत तुकडोजी मार्ग,
भंडारा.

श्री. एन. एन. किरणापुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक श्रेणी-१,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २१.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, ता. गोरेगांव, जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांच्या पत्नी नामे याचनाबाई श्रीराम बावणे यांनी श्री प्रेमलाल रुदाजी पटले, रा. गोरेगांव यांना दिनांक

... २

२.१२.१९८६ रोजी विक्री केलेल्या घराच्या रजिस्ट्रीची प्रत मागितली होती. तथापी त्यांना त्याची प्रत मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २१.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २२.९.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने त्यांची पत्नी सौ. याचनाबाई श्रीराम बावणे यांनी त्यांच्या घराची विक्री श्री. प्रेमलाल रुदाजी पटले यांना दिनांक २.१२.१९८६ रोजी विक्री करुन त्याबाबतची रजिस्ट्री केलेली आहे त्यांच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. त्यासाठी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात खरेदी विक्री नोंदणी संदर्भात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पाहणी करण्यात आली. तथापी अपीलकर्त्यास पाहिजे असलेले दस्ताऐवज त्यांचे कार्यालयात नोंदणी झालेले दिसून आले नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २७.९.२०१० च्या पत्राने असे कळविले की, या कार्यालयातील दिनांक २.१२.१९८६ रोजीचे अभिलेख तपासले असता विक्री करणार श्रीमती याचनाबाई श्रीराम बावणे व खरेदी करणार श्री. प्रेमलाल रुदाजी पटले, रा. गोरेगांव यांनी रजिस्ट्री केल्याचे दिसून येत नाही. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे प्रस्तुत प्रकरणी असे म्हणणे आहे की, त्यांना तलाठीकडून जो फेरफार पंजी मिळाली आहे त्या फेरफार पंजीमध्ये दिनांक २.१२.१९८६ चा रजिस्ट्रीचा उल्लेख आहे म्हणून त्यांना त्या रजिस्ट्रीची प्रत पाहिजे आहे.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक २०.१०.२०१० रोजी दाखल झाले होते. तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहितीबाबत समाधान झाले असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील मागे घेतले. म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय देण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही.

... ३

५.	अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने दिनांक २.१२.१९८६ रोजी सौ. याचनाबाई श्रीराम बावणे यांचे घर खरेदीबाबत व घर खरेदी करणारे श्री. प्रेमलाल रुदाजी पटले यांनी रजिस्ट्री केलयाचे दिसून येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयातील अभिलेख तपासणी अंती अपीलकर्त्यास दिनांक २७.९.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-	दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९८/२०११.

श्री. राजकुमार बारसुजी महाकाळे,
द्वारा - श्री. एम. जे. आवळे,
४२, कानफाडे नगर, वर्धा रोड,
नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (महसूल),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. सी. पी. सिरसाम,
जनमाहिती अधिकारी तथा
चिटणीस,
आयुक्त कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मा.राज्य माहिती आयोग, खंडपीठ

नागपूर यांचेकडील आदेश पारीत दिनांक २.४.२००९ मधील आदेशानुसार उपविभागीय अधिकारी, उमरेड यांचेवर शिस्तभंगाचे कारवाईचे आदेश दिलेले होते. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून उपआयुक्त (महसूल) यांचेकडे दिनांक ५.१.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचे निर्णयात जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून शिस्तभंग विषयक प्रस्ताव मागवावे असा निर्णय दिला. त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल) यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दिनांक २५.१०.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये असे नमुद केले की, प्रस्तुत प्रकरणात जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कडील दिनांक ३.१२.२००९ अन्वये उपविभागीय अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचे अधिकार नसल्यामुळे त्याबाबत आदेशाचे प्रतीसह प्रस्ताव जिल्हाधिकारी, नागपूर यांनी सादर केला आहे. त्यावर दिनांक ४.२.२०१० रोजी व दिनांक २९.३.२०१० रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांना प्रस्तुत प्रकरणाचे अनुषंगाने राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडील दिनांक २.४.२००९ चे आदेशातील परिच्छेद १ विचारात घेऊन प्रथमतः सदर प्रकरणी जबाबदार तत्कालीन जनमाहिती अधिकारी किंवा सदर प्रकरण उपलब्ध करुन देण्यास जे अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदार असतील त्यांची जबाबदारी निश्चित करावी व तद्नंतर जबाबदार असणाऱ्या संबंधिताविरुध्द कारवाई करण्यासाठी शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांचेकडे परिशिष्ट १ ते ४ दोषारोप सिध्द होण्याचे दस्तऐवजासह या कार्यालयास सादर करण्यास कळविण्यांत आले आहे. तथापी अहवाल अद्याप अप्राप्त आहे अशी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरचे दिनांक २५.१०.२०१० चे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाचे यु.पी.सी.द्वारे पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविले. मात्र सदरचे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाने प्राप्त झाले नाही म्हणून सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी अपीलकर्त्याने प्राप्त केल्याचे सुनावणीत नमुद केले.

४.    अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कडून संबंधिताविरुध्द शिस्तभंगाचे विषयक प्रस्ताव परिशिष्ट १ ते ४ मध्ये दस्तऐवजासह मागविले आहे. तथापी जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून सदरचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेले दिसून येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.२.२०११ रोजी पुन्हा जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे अ.शा.प.क्र. पाठवून प्रस्ताव मागविलेला आहे व सदरचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यावर पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.१०.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलबध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४३८-४४०/३.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३०५/२०११.**

श्री. विजय उमराव डोंगरे ऊर्फ डोंगरवार,
वार्ड क्र. ३, पंचशील झेंडा चौक,
मु. पो. कटंगीकला, ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोदिया.

श्री. संजय बनकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात चौकशी करणारे विस्तार अधिकारी श्री. के. एच. चवरे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दिनांक ६.१.२०१० रोजी ग्रामपंचायत, कटंगीकला, जि. गोंदिया या ग्रामपंचायतीमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबत तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जाचे संदर्भात केलेली कार्यवाही व विलंबाची कारणे इत्यादी बाबतची माहिती

मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २१.८.२०१० च्या पत्राने असे कळविण्यात आले की, आपला दिनांक ६.१.२०१० ला दिलेल्या अर्जानुसार चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. तथापी काही अपरिहार्य कारणामुळे सखोल व निपक्षपाती चौकशी करण्यास वेळ लागला. आपण कळविल्यानुसार सखोल चौकशी पूर्ण होऊन चौकशी अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, गोंदिया यांना सादर करण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. तथापी या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक १५.९.२०१० रोजी प्रथम अपील खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. मात्र त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा खंडविकास अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन दिनांक २१.८.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आली व त्यामध्ये असे नमुद केले की, आपला दिनांक ६.१.२०१० ला दिलेल्या तक्रार अर्जाची चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. मात्र काही अपरिहार्य कारणामुळे सखोल व निपक्षपाती चौकशी करण्यास वेळ लागता. आपण कळविल्यानुसार येत्या १५ दिवसांत सखोल चौकशी पूर्ण होऊन चौकशी अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, गोंदिया यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. प्रस्तुत प्रकरणातील चौकशी करणारे विस्तार अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, चौकशीचे दरम्यान त्यांना हृदयविकाराचा झटका आला असल्यामुळे ते दवाखान्यात भरती होते. त्यामुळे चौकशी कामास विलंब झालेला आहे. तथापी आता चौकशीचे कामकाज पूर्ण केले आहे तो चौकशी अहवाल आता सादर करण्यात आला आहे.

... ३

५. अपीलकर्त्यानी त्यानंतर प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे दाखल केले होते. त्या अपीलाची अंतीम सुनावणी दिनांक ९.११.२०१० रोजी घेण्यात आली व त्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.११.२०१० ला दिलेला असून प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, चौकशी अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांचे सुट्टीचे कालावधीतील सुट्टीच्या व मंजूर झालेल्या आदेशाच्या प्रमाणित प्रती देण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे अपीलकर्त्यास त्यांच्या प्रती देण्यात आल्या आहेत असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने केलेल्या तक्रार अर्जाची चौकशी पूर्ण झालेली असून चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिंया यांचेकडे सादर करण्यात आला आहे. त्या चौकशी अहवालाचे अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी दिनांक १०.३.२०११ रोजी गैरव्यवहाराबाबत जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्या विरुध्द कार्यवाही दिनांक १०.३.२०११ च्या आदेशान केलेली आहे. त्याची प्रत अपीलकर्त्यास आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. त्यामुळे अपीलकर्त्यास दिनांक ६.१.२०१० च्या तक्रार अर्जावर झालेली कार्यवाही संबंधी अपेक्षित माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४४१-४४३/४.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३०४/२०११.

सौ. शांता रामभाऊ वावरकर,
साई मंदिराजवळ, तकीया वार्ड,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. सु. वि. राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी सहसंचालक,
उपसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, नागपूर.

श्री. यु. आर. खारोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाधिकारी,
जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक १०.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन भंडारा येथील तकीया वार्डातील साईमंदीराजवळील असलेल्या ऐश्वर्या ब्युटी पार्लर व जयश्री ब्युटी पॉर्लर या दोन ब्युटी पार्लरला शासन मान्यता आहे काय याबाबत माहिती मागितलेली होती.

३. तथापी सदरचा माहितीचा दिनांक १.९.२०१० चा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय

... २

शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, भंडारा यांचेकडे प्राप्त झाला नसल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्तीचे प्रथम अपील दिनांक ५.१०.२०१० चा प्रथम अपील अर्ज देखील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला नसल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले. याबाबत अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती मागण्याचा अर्ज व प्रथम अपीलाचा अर्ज हा पोस्टाने यु.पी.सी.च्या माध्यमातून पाठविला होता. त्याचा यु.पी.सी.चा पुरावा त्यांनी आयोगासमोर दाखविला. मात्र सदरचा माहितीचा अर्ज व प्रथम अपीलाचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी सांगितले. मात्र आयोगाचे कार्यालयातील द्वितीय अपीलाची सुनावणीची नोटीस त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज व प्रथम अपीलाचा अर्जाचा शोध घेतला. त्यावेळी देखील कार्यालयामध्ये माहितीचा अर्ज व प्रथम अपीलाचा अर्ज प्राप्त झाल्याची नोंद आवक रजिस्टरमध्ये नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. तथापी आयोगाकडील द्वितीय अपीलाची सुनावणीची नोटीस सोबत अपीलकर्त्याच्या माहितीचा अर्जातील प्रत त्यांचेकडे प्राप्त झालेले आहे. त्याला अनुसरुन अपीलकर्तीची आयोगाकडे माहिती सादर केलेली आहे व त्यामध्ये असे नमुद केले आहे की, अपीलकर्तीने ज्या ब्युटी पार्लर विषयी माहिती मागितलेली आहे त्या ब्युटी पार्लरची त्यांचे कार्यालयाकडून मान्यता देण्यात आलेली नाही व त्याची प्रत अपीलकर्तीस त्यांनी आयोगासमोर उपलब्ध करुन दिली.

४. म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीने मागितलेल्या माहिती मध्ये दोन्ही ब्युटी पार्लरला जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून मान्यता देण्यात आलेली नाही असे माहिती आयोगासमोर माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्तीचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४४४-४४५/४.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३०६/२०११.**

श्री. सुरेश झिंगुजी राक्षे,
रा. ठाणेगांव, ता. कारंजा (घा.)
जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
आर्वी, जि. वर्धा.

श्री. बु. मा. मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस उपनिरिक्षक,
पोलीस स्टेशन कारंजा (घा.),
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. डी. जी. घोनमोडे, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी पोलीस स्टेशन, कारंजा यांचेकडे दिनांक ६.२.२०१० श्री. बी. बी. कडवे यांना ठाणेदार व अन्य दोन पोलीसांनी मारहान केली त्याबाबत एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या माहितीचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.६.२०११ रोजी

... २

माहिती उपलब्ध झाल्याचे उपविभागीय अधिकारी, आर्वी यांना माहिती प्राप्त झाल्याचे पत्र दिले आहे. तसेच जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपनिरिक्षक, पोलीस स्टेशन, कारंजा(घा.) यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांना निवेदन सादर करुन श्री. सुरेश झिंगुजी राक्षे, रा. ठाणेगांव यांना आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात आली आहे. आता त्यांचे काही एक म्हणणे नाही. याबाबत कोणतीही तक्रार उद्‌भवल्यास मी जबाबदार राहीन असे लेखी निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३११/२०११.**

श्री. अनिल फुलचंदजी रावत,
गांधी चौक, वार्ड क्र. ६,
ता. नरखेड, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, नरखेड,
जि. नागपूर.

श्री. प्रमोद भाऊरावजी निकाजु,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ बांधकाम व पाणी पुरवठा पर्यवेक्षक,
नगर परिषद, नरखेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ६.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. रुपेश ढोके, मुख्य लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणात कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ बांधकाम व पाणी पुरवठा पर्यवेक्षक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २१.१०.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता.

... २

अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या संदर्भात गैरअर्जदार श्री. दुर्गाप्रसाद कामतालाला टुमने, रा. नरखेड यांच्या जुन्या मकानाबाबत इ.स. १९४८ नगर परिषद स्थापनापासून ते आजपर्यंत जुन्या वडिलोपार्जित घरावर टप्प्याटप्प्याने वेळोवेळी करण्यात आलेल्या आजपर्यंतच्या संपूर्ण बांधकामाची माहिती, मंजूर आदेश व नकाशे इत्यादींच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९४८ म्हणजे नगर परिषद, नरखेडच्या स्थापनेपासून सुमारे ६० वर्षापुर्वीची असल्यामुळे मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला व ज्या ज्या वर्षाची माहिती ज्या ज्या वेळी शोधून मिळाली ती संकलीत करण्यात आली. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९४८ पासून असल्यामुळे बरीचशी कागदपत्रे ही उपलब्ध होण्यास विलंब लागला व ही माहिती शोधण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबतची जाणीव अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी वेळोवेळी करुन दिलेली होती असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीचे वेळी देखील असे दिसून आले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९४८ पासूनची असल्यामुळे त्यामध्ये बराचशा कालावधी माहिती शोधण्यास लागला आहे. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पुन्हा ८ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी नमुद केले. त्याला अनुसरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिला व त्या निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ८ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले.

४. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली सन १९४८ पासूनच्या संपूर्ण माहितीचे संकलन करुन अपीलकर्त्यास दिनांक २२.२.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिली त्याबद्यल अपीलकर्त्याचे समाधान झाल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले व अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाल्याची पोच देखील जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविली.

५. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती वर नमुद केल्याप्रमाणे उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४४८-४५०/६.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३०८/२०११.

श्री. मंगेश वामनराव येवले,
मु. पो. पालांदूर (चौ.), ता. लाखनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. यादव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सांख्यिकी अधिकारी, आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्विन्स गार्डन, पुणे - ४११ ००१.

श्री. ए. टी. पाटणकर,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन सहाय्यक, आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्विन्स गार्डन, पुणे - ४११ ००१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ६.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तिाा आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना अनुसुचित जमातीच्या सामाजिक चालीरिती , प्रथा व परंपरा बाबत एकूण १८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त झाली त्यामुळे आता अपील चालवू नये अशी विनंती अपीलकर्त्याने रोजनाम्यावर सही करुन केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४५१/६.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३१४/२०११.

श्री. डॉ. भास्कर रामराव काटे,
७१, विद्या विहार, श्रीप्रभा,
प्रतापनगर, नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.६.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी तर्फे श्री. दोरवे, मुख्य प्रशासकीय अधिकारी हे हजर आहेत.

... २

२.  अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई व जनमाहिती अधिकारी तथा सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाबाबत मुंबई येथे सुनाक्णी झाली आहे. त्यामुळे सुनावणी घेऊन निर्णय देण्याची आवश्यकता नाही असे अपीलकर्त्याने दुरध्वनीवरुन कक्ष अधिकारी, श्री. गोटेकर यांना कळविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३२१/२०११.

श्री. सतिश सादुजी दुरटकर,
द्वारा - सतिश दादाजी शास्त्रकार,
नेहरुनगर वार्ड नं. ४, डी.आर.सी. रोड,
विश्वकर्मा मंदिर जवळ, चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड,
डिव्हीजन कार्यालय, ता. वरोरा,
जि. चंद्रपूर.

श्री. ए. आर. पवार,
जनमाहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड,
डिव्हीजन कार्यालय, ता. वरोरा,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. आर. एन. गणोरकर, स्वीय सहाय्यक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी

... २

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, डिव्हीजन कार्यालय, वरोरा यांचेकडे माहितीच्या अधिकारखाली अर्ज सादर करुन शेती पंपाबाबत एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, वरोरा यांचेकडे दिनांक १२.४.२०१० रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २.३.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सहाय्यक अभियंता, महावितरण, चिमूर यांचेशी संबंधित असल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १७.३.२०१० रोजीच्या पत्राने सहाय्यक अभियंता, महावितरण, चिमूर यांचेकडे माहितीचा अर्जाची प्रत पाठवून त्यांचेकडून माहिती मागविली व त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्यानंतर सहाय्यक अभियंता, चिमूर यांचेकडून त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १९.३.२०१० च्या पत्राने माहिती प्राप्त झाली व सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक ३०.३.२०१० च्या पत्राने कुरिअर सेवेमार्फत पाठविण्यात आली व दिनांक ३०.३.२०१० च्या पत्रात असे नमुद केले की, सन २००७ ते २००९ पर्यंत शेती पंपासाठी चिमूर विभागाकडे एकूण ६९१ अर्ज प्राप्त झाले असून त्यांचे सविस्तर विवरण यादीसाठी रुपये ६०/- चा भरणा करावा असे कळविले. मात्र याबाबत अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडील दिनांक ३०.३.२०१० चे पत्र त्यांना दिनांक ११.५.२०१० रोजी प्राप्त झाले. सदरचे पत्र कुरिअर सेवेमार्फत अपीलकर्त्यास पाठविल्याचे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र कुरिअर सेवेने सदरचे पत्र अपीलकर्त्यास कोणत्या दिवशी दिले आहे हे जनमाहिती अधिकारी यांनी पुरावा दाखविला नाही. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ३०.३.२०१० चे पाठविलेले पत्र मुदतीत प्राप्त झाल्याचे दिसत नाही. म्हणून आता अपीलकर्त्याकडून माहितीचे शुल्क रुपये ६०/- घेणे योग्य होणार नाही. माहिती पुरविण्यास विलंब झाला असल्यामुळे अपीलकर्ता हे विनाशुल्क माहिती घेण्यास पात्र दिसून येतात. म्हणून अपीलकर्त्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

४. तसेच प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्या प्रथम अपीलाची सुनावणी कार्यकारी अभियंता यांनी घेतलेली नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) प्रमाणे त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी पार पाडलेली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबतची पुर्नरावृत्ती करण्यात येऊ नये. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सन २००७ ते २००९ पर्यंत शेती पंपासाठी चिमूर उपविभागात दाखल झालेले एकूण ६९१ शेतकऱ्यांच्या यादीची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४५४-४५६/७.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३१९/२०११.

श्री. हरीष मनोज भगत,
DSMQ/४ E, नेताजी क्रीडांगण,
वायगांव डब्ल्यू.सी.एल.,
ता. उमरेड, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी. एन. खापेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. उमरेड, जि. नागपूर.

श्री. सी. पी. साठकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी,
वायगांव (घोटुर्ली),
ता. उमरेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३०.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, वायगांव घोटुर्ली, ता. उमरेड, जि. नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत वायगांव घोटुर्लीमध्ये सन २००९ ला दक्षता समिती गठीत आहे त्याबाबत एकूण ६ मुद्यांची माहिती

... २

मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १.११.२०१० ला माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी तहसीलदार, उमरेड यांचेकडे दिनांक५.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की, मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेशाप्रमाणे ग्रामपातळीवर रेशनधान्य दुकानदारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ही दक्षता समितीची नेमणूक करण्यात आली आहे. त्या दक्षता समितीमध्ये गावाचे सरपंच अध्यक्ष असून तलाठी हे सचिव आहेत व इतर सदस्यांचा त्यामध्ये समावेश आहे. त्यासमितीमध्ये अपीलकर्ता यांना घेण्यात आले होते. तथापी अपीलकर्ता यांचे विरुध्द स्वस्तधान्य दुकानदार व केरोसीन दुकानदार यांनी तक्रारी केल्यामुळे अध्यक्षांनी अपीलकर्त्यास समितीतील इतर सदस्यांशी चर्चा करुन कमी केले व त्यांचे ऐवजी दुसऱ्या व्यक्तीस नेमणूक केली. त्याबाबत अपीलकर्त्याने माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १.११.२०१० रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीमध्ये काही माहिती ही प्रश्नोत्तर स्वरुपाची होती तरी देखील त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली असे तलाठी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने तहसीलदार, उमरेड यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणीमध्ये देखील तहसीलदार यांचे आदेशान्वये अपीलकर्त्यास ६ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अाकारी व तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र या दक्षता समितीतून कमी करण्याबाबत आमसभा कोणत्या तारखेला घेण्यात आली. त्या सभेची नोटीस व त्याची प्रत त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्त्याने नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्यास समितीतून नाव कमी करतांना आमसभा घेण्यात आली नाही. त्यामुळे आमसभेची नोटीस काढण्यात आली नाही म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी याबाबत स्पष्टपणे कळविणे

आवश्यक आहे. त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास या मुद्यांची व इतर मुद्यांची वस्तुस्थिती दर्शक माहिती अपीलकर्त्यास पुन्हा उपलब्ध करुन दिली. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४५७-४५९/७.६.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३१८/२०११.

श्री. चौकलाल जोगीलाल वाळवे,
मु. पो. तिमेझरी, ता. गोरेगांव,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जलस्वराज प्रकल्प,
जिल्हा परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा प्रकल्प अधिकारी,
जलस्वराज प्रकल्प,
जिल्हा परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ७.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २३.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हा प्रकल्प अधिकारी, जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन ३००६ ते २०१० या कालावधीमध्ये तिमेझरी मार्फत आलेल्या पाणी टॅंक बांधकामाचे इस्टीमेट कॉपी व एम.बी. रेकॉर्डची प्रत तसेच ग्रामदुत यांना देण्यात येणाऱ्या मानधनाबाबत माहिती ग्राम पंचायतच्या बोरवेलचे कनेक्शन लावण्याबाबतची माहिती मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी कार्यालय जिल्हा प्रकल्प अधिकारी, जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद गोंदिया हे व प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, गोंदिया हे दोन्ही अधिकारी आयोगापुढे सुनावणीस गैरहजर राहिले. तसेच त्यांचे वतीने देखील कोणीही हजर राहिजे नाही. त्याचप्रमाणे त्यांनी प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे लेखी कागदपत्रे सादर केलेली नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचे माहिती अधिकाराखालील अर्जाची गंभीरतेने दखल घेतलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे कडील दिनांक २३.९.२०१० च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती अधिकाराखालील अर्जान्वये ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्याचप्रमाणे आजच्या सुनावणीस ते आयोगासमोर हजर झाले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो व सदरच्या विलंबास जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- कां शास्ती लादण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगासमोर सादर करावा अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी जल स्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, गोंदिया हे देखील सुनावणीस गैरहजर राहिले. तसेच त्यांनी प्रस्तुत प्रकरणी कोणताही लेखी अहवाल आयोगापुढे सादर केलेला नाही. म्हणून त्यांचे विरुध्द देखील शिस्तभंगाचे कार्यवाहीची कां शिफारस करु नये याचा लेखी खुलासा त्यांना हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगापुढे सादर करावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४६०-४६१/७.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३२४/२०११.**

श्री. दिलीप गजाननराव खेडीकर,
नयापुरा राममंदिर जवळ, प्रेमनगर,
वार्ड क्र. ३४, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. कि. ए. जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त,
झोन क्रमांक ३, केळीबाग रोड,
पोलीस स्टेशन कोतवाली, महाल,
नागपूर.

श्री. डॉ. सुर्यभान ग. इंगळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
पोलीस स्टेशन, लकडगंज,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २३.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज

... २

सादर करुन सहाय्यक आयुक्त, महानगरपालिका, झोन क्रमांक ७ यांनी दिनांक २१.१०.२०१० च्या अर्जानुसार पोलीस सहायता मिळविण्याकरिता पोलीस स्टेशन लकडगंज येथे दिलेल्या अर्जानुसार मा.वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांनी मा. जिल्हाधिकारी, मा. पोलीस आयुक्त, मा.पोलीस उपायुक्त यांना एक वरिष्ठ पोलीस निरिक्षक व १९ महिला व पुरुष पोलीस कर्मचारी अतिक्रमण हटविण्याकरिता परवानगी देण्याकरिता दिलेल्या अर्जाची प्रत व त्यासंदर्भात एकूण १४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. अर्जाचे अनुषंगाने त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीमध्ये "This Copy is supplied under The Right to information Act २००५ and shall not be used as a proof in any proceedings" असा शिक्का मारुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १७.१.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना वर नमुद केलेल्या शिक्क्या प्रमाणेच माहिती उपलब्ध झाली म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले व असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा उपयोग अपीलकर्ता यांना पुरावा म्हणून कुठेही उपयोग करण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीचा पुरावा म्हणून उपयोग करता येणार नाही असा मारलेला शिक्का हा माहिती अधिकार कायद्याला विसंगत आहे. म्हणून त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर असा कोणत्याही प्रकारचा शिक्का मारता कामा नये असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यास त्यांचे माहितीच्या अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत संपूर्ण माहिती दिलेली आहे. मात्र सदरच्या माहितीवर वर नमुद केल्याप्रमाणे या माहितीचा उपयोग पुरावा म्हणून करता येणार नाही असा शिक्का मारुन दिलेला आहे. तथापी याबाबत अपीलकर्त्याचा आक्षेप असल्यास सदरच्या उपलब्ध करुन दिलेली माहिती वरील शिक्का काढुन सुधारित माहिती अपीलकर्त्यास पुरविण्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले.

४. वास्तविक पाहता माहितीच्या अधिकाराखाली अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा पुरावा म्हणून उपयोग करण्याचा अधिकार अपीलकर्त्याला माहिती अधिकारान्वये प्राप्त होतो. म्हणून वर नमुद केलेला शिक्का पुरविलेल्या माहितीवर मारणे ही कृती योग्य नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहितीचा उपयोग पुरावा म्हणून करता येणार नाही अशा प्रकारचा शिक्का न मारता सुधारित माहिती विनामुल्य त्वरित उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३२९/२०११.**

श्री. दिनेश रामदयाल तांबेकर,
रा. बुधवारीपेठ, गोटेखनी,
ता. उमरेड, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.

श्री. विजय ज्ञा. पवार,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. ई. एस. बघेले, सिरस्तेदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १६.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागभिड, जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन तहसीलदार यांना वाहन जीप क्रमांक एम.एच. ३४ - ८०८० या वाहनाचे लॉगबुकचे खालील कालावधीचे प्रती मागितलेल्या होत्या.

... २

१) दिनांक १७.३.१९९९ ते ३१.१०.२०००, २) दिनांक १.११.२००० ते २२.१.२००२, ३) दिनांक २३.१.२००२ ते २३.६.२००३ व ४) दिनांक १.३.२००५ ते १८.११.२००६ पर्यंत तथापी त्यांना विहित मुदतीत वरील कालावधीचे लॉगबुकच्या प्रती मिळाल्या नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी यांचेकडे दिनांक ३०.७.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणीनंतर प्रथम अपीलाचा असा निर्णय देण्यात आला की, जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागभिड यांनी जीप क्रमांक एमएच-३४-८०८० चे लॉगबुकचा आपले अभिलेखागारात शोध घ्यावा व अपीलकर्त्यास ७ दिवसांचे आंत विनामुल्य माहिती पुरवावी. तथापी त्यानंतरही अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागभिड यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दिनांक १६.६.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे सन १९९९ ते २००६ या कालावधीतील वाहनाचे लॉगबुकच्या प्रती मागितलेल्या होत्या. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे १० वर्ष पुर्वीची असल्यामुळे सदर लॉगबुकाचा शोध घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक ५.७.२०१० च्या पत्राने असे कळविले की, सदर लॉगबुकाचे शोध घेण्याची कार्यवाही सुरु असून सदर लॉगबुक मिळताच आपणास तात्काळ माहिती पुरविण्यात येईल असे तहसीलदार यांनी सुनावणीत नमुद केले. त्यानंतर पुन्हा अपीलकर्त्यास दिनांक २८.७.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागणी केलेले वाहन क्रमांक एम.एच. ३४-८०८० चे लॉगबुकचा शोध घेणे सुरु आहे. संबंधित वाहन चालकाला देखील या कार्यालयाने त्यांचे कार्यकाळातील लॉगबुक मधील नोंदी पुर्ण करुन लॉगबुक सादर करण्यास कळविलेले आहे. परंतु संबंधिताकडून अद्यापपर्यंत माहिती या कार्यालयास उपलब्ध झ ालेली नाही असे अपीलकर्त्यास पुन्हा कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी होऊन लॉगबुकचा शोध घेऊन अपीलकर्त्यास ७ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागभिड यांना दिलेले आहे.

४. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात लॉगबुकचा शोध घेतला. तसेच नायब नाझर यांचेकडे देखील लॉगबुकाबाबत शोध घेण्याची कार्यवाही करण्यात आली. तथापी सदरच्या कालावधीतील लॉगबुक अभिलेख कक्षात किंवा इतरत्र उपलब्ध झाले नाही म्हणून पुन्हा अपीलकर्त्यास दिनांक १२.८.२०१० च्या पत्राने असे कळविले की, सदरच्या कार्यकाळाचे लॉगबुक उपलब्ध नाही. तसचे तहसीलदार, नागभिड यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, दिनांक ५.६.२००० ते दिनांक ३.९.२००२ या कालावधीत रोजंदारी वाहन चालक कार्यरत होते. त्याला देखील लॉगबुकच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे कळविण्यात आले होते. मात्र त्यांचेकडूनही लॉगबुकच्या प्रती मिळाल्या नाही.

५. अपीलकर्ता, तसेच, जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे सन १९९९ ते २००६ या कालावधीतील लॉगबुकचा प्रती मागितलेल्या होत्या. तथापी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात शोध घेऊनही सदरच्या प्रती उपलब्ध झाल्या नाही म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १२.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४६५-४६७/८.६.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३२६/२०११.

श्री. संदीप प्र. देशपांडे,
रा. दुर्गाचौक, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. टी. रणदिवे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कामठी, जि. नागपूर.

श्रीमती बी. डी. सोनटक्के,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १३.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी पंचायत समिती, कामठी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन कामठी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामपंचायत मधील गत ५ वर्षाची विकासात्मक कार्य व त्यांना लागतमुल्य यांचा अहवाल द्यावा. तसेच सर्व ग्राम सचिवांचे सेवापुस्तक रेकॉर्ड व त्यांचेवर आजपर्यंत करण्यात आलेल्या

... २

कार्यवाहीचा अहवाल इत्यादी माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. परंतु सदरची माहिती अपूर्ण असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, कामठी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली व त्या सुनावणीत त्यांना जी माहिती प्राप्त झाली ती अपूर्ण प्राप्त झाली व ग्राम सेवकांच्या सेवापुस्तकांच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

२. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही कामठी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या संदर्भात ५ वर्षाचे विकास कार्य व त्यांचा खर्च इत्यादी माहिती मागितलेली होती. सदरच्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठी असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.१०.२०१० च्या पत्राने कामठी तालुक्यातील ग्राम पंचायतीच्या सर्व सचिवांना पत्र लिहून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ६(३)(दोन) अन्वये अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचेकडे हस्तांतरण केला व नियमानुसार फी आकारुन अपीलकर्त्यास माहिती त्वरित पुरवावी असे सर्व ग्रामपंचायत सचिवांना दिनांक १५.१०.२०१० च्या पत्राने कळविले व त्याची प्रत अपीलकर्त्यास देण्यात आली. तसेच अपीलकर्त्याने सचिवांचे सेवापुस्तकातील कोणत्या नोंदी विषयीची माहिती व कोणत्या कार्यवाहीची माहिती अपेक्षित आहे याबाबत स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे तसे स्पष्ट करण्याबाबत कळविले. तसेच ग्राम सचिवांचे प्रॉपर्टीचे दस्तऐवज त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे देखील अपीलकर्त्यास दिनांक १५.१०.२०१० च्या पत्राने कळविले.

३. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते व सुनावणीचे वेळी अपीलकर्त्यास कामठी पंचायत समिती अंतर्गत असलेल्या सर्व ४४ ग्रामपंचायतीची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्याने प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र त्यांना पंचायत समितीच्या सचिवांच्या

सेवापुस्तकांमधील नोंदीची माहिती मिळालेली नाही. यावर जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याला सचिवांच्या सेवापुस्तकांमधील नेमक्या कोणत्या नोंदी पाहिजे याचा उल्लेख नसल्यामुळे त्यांना त्या पुरविता आल्या नाही. तथापी पंचायत समिती कार्यालयात ग्राम पंचायत सचिवांचे सेवापुस्तक आहेत त्या सेवा पुस्तकांच्या झेरॉक्स प्रती अपीलकर्त्यास शुल्क आकारुन उपलब्ध करुन देणे योग्य होईल आणि सदरचे शुल्क भरणा करण्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी ग्रामपंचायतच्या सर्व सचिवांचे सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रती अपीलकर्त्याकडून माहितीच्या शुल्क भरुन घेतल्यानंतर उपलब्ध करुन द्याव्यात. त्यासाठी माहितीच्या शुल्काची आकारणी करुन अपीलकर्त्यास कळवावे व अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४६८-४७०/८.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३३४/२०११.**

श्री. रामसागर पुंडलिक पिलेवान,
८३, हिंदुस्थान कॉलोनी, वर्धा रोड,
नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधिक्षक,
जि. भंडारा.

श्री. दत्तात्रय ओ. जाधव,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
ता. पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. बी. एस. महाजन, पोलीस उपअधिक्षक, भंडारा हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ५.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याच्या सदरच्या अर्जामध्ये मौजा पवनी येथील सिटी सर्व्हे नं. २७, न.भू.क्र. २३८२ अंतर्गत पोट हिस्सा क्षेत्र ८८.०

चौ.मि. प्रमिलाबाई गजभिये/भाऊराव गजभिये, दिपकभाई पटेल यांनी दुर्योधन पिलेवान व इतर यांचेकडून खरेदी करुन व मोजणी करुन आपआपल्या जागेवर अतिक्रमण केले आहे असे पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, पवनी यांनी आवश्यक दस्ताऐवजासह मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पवनी यांना प्रतिवृत्त क्र. २७८/२००४ कलम १०७, ११६(३) जा.फौ. निवेदन सादर केल्याच्या अनुषंगाने भाऊराव गजभिये यांनी पोलीसात सादर केलेले दस्ताऐवज त्यांची मोजणी फीची साक्षांकित प्रत व विक्रीपत्राची प्रत ८८.० चौ.मि.क्षेत्र अर्जदारास पुरविण्यात यावी अशी माहिती त्यांनी मागितलेली होती.

४. अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.११.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की, मोजनी फीची साक्षांकित प्रत आमचे कार्यालयात उपलब्ध नसल्याने सदर साक्षांकित प्रत संबंधित विभागाकडे मिळण्याबाबत विनंती करावी. तसेच विक्री पत्राची प्रत या कार्यालयात उपलब्ध असल्याने ७ प्रतीचे रुपये २/- प्रतीप्रत याप्रमाणे रुपये १४/- शुल्क भरणाकरुन प्राप्त करुन घ्यावेत असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क दिनांक ६.१२.२०१० रोजी रुपये १४/- भरले व अपीलकर्त्यास विक्री पत्राची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दिनांक २४.१२.२०१० रोजी पोलीस उपअधिक्षक, भंडारा यांचेकडे दाखल केले. त्याची सुनावणी दिनांक ७.१.२०११ रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात येऊन त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्याने मागणी केलेल्या मोजणी फीची साक्षांकित प्रत भुमी अभिलेख, पवनी या कार्यालयाशी संपर्क साधून प्राप्त करावी. सदर बाबही पोलीस खात्याशी संबंधित नाही व अपीलकर्त्यास विक्री पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे सांगितले.

६. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या विक्री पत्राच्या प्रती अपीलकर्त्यास त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. मात्र मोजणी फी ची प्रत त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध

नसल्यामुळे ती प्रत भुमी अभिलेख, पवनी कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले आहे ते योग्य दिसून येते. तसेच अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी विक्रीपत्राची प्रत उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४७१-४७३/९.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३३५/२०११.**

श्री. विष्णुदास ईस्तारी पुरामे,
मु. पो. ता. लाखांदूर, जुन्या मोटार स्टॅन्ड जवळ,
जि. भंडारा - ४४१ ८०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधिक्षक,
जि. भंडारा.

श्री. दत्तात्रय ओ. जाधव,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
ता. साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. बी. एस. महाजन, पोलीस उपअधिक्षक, भंडारा हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, साकोली यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २७.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता.

... २

अपीलकर्त्याने त्या अर्जामध्ये दिनांक २६.७.२०१० रोजी पोलीस स्टेशन, लाखनीला दिलेल्या रिपोर्टचा एफ.आय.आर. तसेच रिपोर्टनुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पोलीस स्टेशन, लाखनीशी संबंधीत असल्याने त्यांचेकडून ती माहिती मागविण्यात आली. त्यानुसार ठाणेदार, लाखनी यांचेकडून चौकशीचा अहवाल प्राप्त झाला व त्या चौकशी अहवालाची प्रत व त्यांचे सोबत जोडण्यात आलेल्या बयाणाच्या प्रती दिनांक ८.१०.२०१० रोजी उपलब्ध करुन देण्यात आली.

३. त्यानंतर अपीलकर्त्याने पोलीस अधिक्षक, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दिनांक ८.११.२०१० रोजी दाखल केले. त्याची सुनावणी दिनांक ३०.११.२०१० रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्त्याला जनमाहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील खारीज केले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर असलेले प्रतिनिधी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याला त्यांने दिलेलया तक्रारीच्या संदर्भात एफ.आय.आर. किंवा गुन्हा नोंदीची कार्यवाहीची त्यांनी मागणी केली आहे. तथापी चौकशी अंती असे दिसून आले की, प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांनी खोटे बनावट दस्ताऐवज तयार केल्याचे काही पुरावे नसल्याने गुन्हा दाखल करण्यात आला नाही म्हणून या प्रकरणात एफ.आय.आर. किंवा गुन्हा नोंद झालेला नाही आणि याबाबतची चौकशी अहवाल व त्या सोबतचे घेतलेले बयान यासोबतच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७.९.२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जाला अनुसरुन दिनांक ८.१०.२०१० च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेली आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३३०/२०११.**

श्री. विठ्ठल झिंगरुजी देशमुख,
प्लॉट नं. ७४, राममंदीर जवळ,
सितानगर, वर्धा रोड, नागपूर - ४४० ०२५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर.

श्री. हट्टेवार,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर यांचेकडे प्लॉटचे नामांतरण बाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्तांकडे दिनांक ८.६.२०११ रोजी लेखी निवेदन देऊन आपणास अपील केल्यामुळे घराचे नामांतरण नगर भुमापन अधिकारी क्रमांक ३ यांनी केले. त्यामुळे दिनांक ९.६.२०११ ची सुनावणी रद्द करण्यात यावी असे निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४७७/९.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४१/२०११.**

श्री. अनिल शामराव मुलमुले,
मु. अंबाळा वार्ड, पो. ता. रामटेक,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
वैनगंगानगर, अजनी, नागपूर.

श्री. एच. जी. मुकद्दम,
जनमाहिती अधिकारी तथा
शाखा अभियंता,
पाटबंधारे व्यवस्थापन, शाखा - रामटेक,
ता. रामटेक, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. अरविंद देव, उपविभागीय अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी शाखा अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,शाखा रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन रामटेक तालुक्यातील खुमारी येथील तलाव व कालव्यावर जानेवारी २००५ पासून आजपर्यंत किती खर्च झाला. कोणकोणत्या कामावर

खर्च झाला, काम करणाऱ्या ऐजंसीचे नांव सध्या सदर तलावातून किती हेक्टर शेतीला ओलीत करण्यात येते. कोणत्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली हे काम झाले याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. त्यांना शाखा अभियंता, रामटेक यांचेकडून दिनांक २९.११.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली. परंतु सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही व सदरची माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १०.१२.२०१० रोजी अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, रामटेक यांनी सुनावणीत आयोगापुढे असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २९.११.२०१० च्या पत्राप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने माहितीबाबत त्यांचे समाधान न झाल्यामुळे अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. मात्र प्रथम अपीलाचे सुनावणीत अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. जनमाहिती अधिकारी हे प्रस्तुत अपीलाचे सुनावणीस हजर होते. त्यांचे म्हणणे ऐकून दिनांक ६.१.२०११ रोजी प्रथम अपीलावर निर्णय निर्गमित करण्यात आला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता यांनी दिनांक २९.११.२०१० च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र मुद्या क्रमांक ए व बी मध्ये झालेल्या खर्चाचा नेमका तपशील त्यांना पुरविण्यात आला नाही व मुद्या क्रमांक सी मध्ये पुन्हा त्या कालव्याच्या देखभाल दुरुस्तीवर २००५-२००६ ते २००९-२०१० या कालावधीत खर्च झालेला दिसतो. म्हणून मुद्या क्रमांक ए व बीमध्ये झालेला खर्च हा कराराप्रमाणे झालेला आहे त्याशिवाय देखभाल दुरुस्तीवर झालेला खर्च वेगळा आहे असे स्पष्टपणे नमुद करुन अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ए व बी चा झालेला खर्चाचा तपशील देणे संयुक्तिक होईल.

५.    प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल झाले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली. मात्र अपीलकर्ता सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या अहवालावरुन प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.१.२०११ रोजी देण्यात आलेला आहे.

६.    वास्तविक पाहता प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती योग्य आहे किंवा कसे याचा उहापोह प्रथम अपीलाचे निर्णयात देणे आवश्यक असते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी याबाबत कोणताही उहापोह केलेला दिसून येत नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्याची पुनर्रावृत्ती करु नये अशी समज देण्यात येत आहे.

७.    अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, रामटेक यांनी दिनांक २९.११.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी वर नमुद केलेल्या मुद्या क्रमांक ए व बी बाबतची माहिती स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, रामटेक यांनी अपीलकतर्यास मुद्या क्रमांक ए व बी बाबतची वस्तुस्थितीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४७८-४८०/१०.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४२/२०११ व अपील क्रमांक ३४३/२०११.

श्री. बंडुभाऊ देवाजी चौरागडे,
मु. पो. खापरखेडा, ता. सावनेर,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(पंचायत विभाग) जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. सी. एन. सलामपुरे,
जनमाहिती अधिकारी तथा,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२०१० रोजी दिनांक १७.९.२०१० ला उपआयुक्त यांना दिलेल्या तक्रार निवेदनानुसार आपणास दिलेले पत्र क्रमांक ७२७ व ७२८ विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर यांनी दिनांक १२.१०.२०१० रोजी दिलेल्या आदेशानुसार झालेल्या कार्यवाही अहवालाची सत्यप्रत मागितलेली दिसून येते. सदरच्या दोन्ही अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांना लेखी निवेदन सादर करुन मला संपूर्ण माहिती मिळाली आहे व माझे समाधान झाले आहे. सबब मी केस मागे घेत आहे असे दोन निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४८१/१०.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५१/२०११.**

श्री. सिध्दार्थ सितारामजी गेडाम,
द्वारा - जयप्रकाश हरीजी खोब्रागडे,
सिस्टर कॉलनी, सुंदरनगर, नगीनाबाग,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. आर. घोडमारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, गडचिरोली.

श्री. बी. जी. कुमरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १२.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे माहितीच्या अधिकारा -

खाली अर्ज सादर करुन श्री. बी. जी. कुमरे, कक्ष अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेबाबत एकूण ८ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्याचप्रमाणे श्री. ए. पी. पोटवार, जेष्ठ सहाय्यक, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे संबंधात एकूण ७ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे दिनांक १९.१.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल झाल्या नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १२.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने श्री. बी. जी. कुमरे, कक्ष अधिकारी व श्री. ए. पी. पोटवार, जेष्ठ सहाय्यक यांचेबाबत माहिती मागितलेली होती. त्याला अनसरुन अपीलकर्त्याने दिनांक १९.१०.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ही वैयक्तिक व मिश्र स्वरुपाची असून १ महिन्यापेक्षा जास्त कालावधी त्या माहितीसाठी लागणार आहे. तरी परिपूर्ण माहिती उपलब्ध झाल्यानंतर आपणास पत्राद्वारे अवगत करण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीने अपीलकर्त्यास कळविल्याचे सुनावणीत नमुद केले. त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक ३.१२.२०१० रोजी असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीचे एकूण २५० पेजेस आहेत. त्यासाठी प्रती पेजेस रुपये २/- प्रमाणे रुपये ५००/- माहितीचे शुल्क भरणा करावा असे अपीलकर्त्यास कळविले. मात्र अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केला नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. सदरच्या माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना नको असलेल्या माहितीचे देखील शुल्क कळविण्यात आलेत व त्यामुळे त्यांना नको असलेल्या माहितीचे शुल्क त्यांचेकडून भरुन घेतल्या जाते. यापुर्वी माहिती अधिकाराखाली जी माहिती मागितलेली होती त्या माहिती ऐवजी त्यांना नको असलेल्या माहितीचे शुल्क त्यांचेकडून भरुन घेण्यात आले. म्हणून त्यांनी माहिती शुल्क रुपये ५००/- भरणा केला नाही असे आयोगापुढे सांगितले.

४. तथापी अपीलकर्त्याला पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरणा करण्यास त्यांनी आयोगापुढे तयारी दर्शविली म्हणून प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या माहितीचे निरिक्षण करुन देण्यासाठी आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी व माहितीचे निरिक्षण केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क भरुन घेऊन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

५. तसेच प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्याने प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले होते. मात्र कार्यकारी अभियंता यांनी प्रथम अपीलाची कोणतीही सुनावणी न घेता अपीलकर्त्यास दिनांक २१.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्याने रुपये ५००/- चा भरणा केला नाही असे नमुद करुन अर्ज दप्तरी दाखल करण्यात येत आहे असे कळविल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन योग्य ते आदेश निर्गमित करणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही कार्यकारी अभियंता यांनी केलेली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून याची भविष्यात पुनर्रावृत्ती होणार नाही अशी समज देण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कार्यालयीन कामकाजाचे दिवशी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दस्ताऐवजांचे निरिक्षण करण्यासाठी दिवस व वेळ कळवावे व अपीलकर्त्याने त्यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर दस्ताऐवजांचे निरिक्षण करुन झाल्यानंतर त्यांना पाहिजे असलेल्या दस्ताऐवजांचे शुल्क भरुन घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात त्यांचे लेखी सुचनाद्वारे मिळालेल्या पत्रानुसार उपस्थित राहावे व दस्ताऐवजांचे निरिक्षण करुन घेऊन शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४८२-४८५/१४.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४८/२०११.

श्री. विजय केशवराव चन्ने,
मस्जीद जवळ, गांधी चौक,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर - ४४२ ९०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, राजूरा,
जि. चंद्रपूर.

श्री. प्रभाकर रायपुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निरिक्षक,
नगर परिषद, राजूरा,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, नगर परिषद, राजूरा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांनी सर्व्हे नं. १४८/१ मध्ये श्री. रमेश बारई, प्लॉट नं. १८, यांनी नगरपरिषद, राजूरा कडून बांधकाम परवानगी घेतली नाही. त्यावर नगर परिषद, राजूरा कडून कोणती कारवाई केली त्याची माहिती व कागदपत्राची सत्यप्रत मागितलेली होती.

त्यांना दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये असे नमुद केले की, श्री. रमेश द. बारई यांनी सर्व्हे नं. १४८/१ मधील प्लॉट नं. १८ यांनी नगरपरिषद, राजूरा कडून परवानगी आदेश क्रमांक २५६१, दिनांक १७.११.२००१ अन्वये बांधकाम परवानगी घेतलेली आहे असे त्यांना कळविले. मात्र त्याना यापुर्वी जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १६.१०.२०१० च्या पत्राने याच विषयाबाबत अशी कळविलेले आहे की, सर्व्हे नं. १४८/१ (अ) मध्ये १३ प्लाट धारकांनी बांधकामाची परवानगी घेतलेली आहे. मात्र १३ च्या यादीमध्ये श्री. रमेश द. बारई यांचे नांव नाही. मात्र आता दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी असे कळविले की, श्री. रमेश द. बारई यांनी सर्व्हे नं. १४८/१ मधील प्लॉट नं. १८ या नगरपरिषद, राजूरा कडून परवानगी आदेश क्रमांक २५६१, दिनांक १७.११.२००१ अन्वये बांधकाम परवानगी घेतलेली आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने दिलेल्या माहितीमध्ये व दिनांक १६.१०.२०१० च्या पत्राने दिलेल्या माहितीमध्ये तफावत आहे. या तफावतीबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक २६.१०.२०१० च्या पत्राने दिलेली माहिती ही बांधकाम विभागाकडून प्राप्त झाली होती. त्या आधारे त्यांनी ती माहिती अपीलकर्त्यास दिलेली आहे. मात्र दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने दिलेल्या माहितीनुसार श्री. रमशे द. बारई यांना बांधकाम परवानगी दिलेली आहे. दिनांक १६.१०.२०१० च्या पत्राने नजरचुकीने श्री. रमेश द. बारई यांचे नांव राहून गेलेले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

३. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास श्री. रमेश द. बारई यांना बांधकामाची परवानगी दिल्याचे कळविले आहे. मात्र दिनांक १६.१०.२०१० च्या पत्रात बांधकामास परवानगी दिलेल्या यादीमध्ये श्री. रमेश द. बारई यांचे नांव दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १६.१०.२०१० रोजी दिलेली माहिती यांची कोणतीही खात्री जनमाहिती अधिकारी यांनी केलेली दिसून येत नाही. वास्तविक पाहता माहितीच्या अधिकाराखाली दिलेल्या माहितीची सत्यता पडताळूनच अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक असते. मात्र प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.१०.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे बाबत खात्री करुन घेतलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास चुकीची माहिती

उपलब्ध करुन देण्याच्या कृतीस जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. त्यांनी माहितीच्या तफावतीबाबत केलेला खुलासा असा आहे की, बांधकाम विभागाकडून त्यांना माहिती कळविल्याप्रमाणे त्यांनी अपीलकर्त्यास ही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी सदरचा खुलासा मान्य करण्यासारखा नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.१०.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत व दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने दिलेल्या माहिती बाबतची वस्तुस्थिती विनामुल्य उपलबध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १६.१०.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास दिलेली माहिती बाबत कोणतीही खात्री करुन माहिती दिलेली नाही. त्यानंतर दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीमध्ये वर नमुद केल्याप्रमाणे तफावत आहे. या तफावतीबाबत जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये १०००/- शास्ती त्यांचेवर लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) सदरच्या शास्तीची वसुली मुख्याधिकारी, नगर परिषद, राजूरा, जि. चंद्रपूर यांनी करावयाची आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४८६-४८८/१४.६.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४९/२०११.

श्री. प्रभाकर बालाजी धनकर,
दुर्गानगर, ता. तुमसर,
जि. भंडारा - ४४१ ९१२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विनोद हरकंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
जि. भंडारा.

श्री. चंद्रभान खंडाईत,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. तुमसर, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २५.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन फॅमिली पर्टिकुलर कोणत्या कायद्यान्वये व कोणत्या कलमान्वये देण्यात येते त्याची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना दिनांक २०.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुमसर यांचेकडून माहिती उपलब्ध

... २

करुन दिली व त्यामध्ये असे नमुद केले की, फॅमिली पर्टीकुलर प्रमाणपत्र अर्जदार यांनी सादर केलेला अर्ज, हलफनामा व स्थानिक चौकशी (तलाठी) यांचे अहवालानुसार प्रकरणात जाहीरनामा काढून आक्षेप/उजर मागविण्यांत येते व जाहीरनामा प्रसिध्दी कालावधीत कोणांचे आक्षेप/उजर प्राप्त न झाल्यास कौटुंबिक विवरणपत्र तयार करुन अर्जदार यांना देण्यांत येते. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २७.१२.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलामध्ये सुनावणी दिनांक ८.२.२०११ रोजी झाली व त्यामध्ये असा निर्णय दिला की, जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुमसर यांचेकडे फॅमिली पर्टीकुलर प्रमाणपत्र कोणत्या कायद्यान्वये व कोणत्या नियमान्वये देण्यांत येते याबाबतची मागणी केलेली माहिती ८ दिवसांत निशुल्क पुरविण्यात यावी असे आदेश दिले. मात्र त्यानंतरही समाधानकारक माहिती त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे दिनांक ३०.११.२०१० रोजी मिळाला होता. सदरचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडून तहसीलदार, तुमसर यांचेकडे दिनांक ६.१२.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक २०.१२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ८.२.२०११ रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.२.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुमसर यांनी अपीलकर्त्यास ८ दिवसांचे आंत फॅमिली पर्टीकुलर प्रमाणपत्र कोणत्या कायद्यान्वये व कोणत्या नियमान्वये देण्यांत येते याबाबतची माहिती निशुल्क पुरवावी असा आदेश प्रथम अपीलाचे निर्णयात देण्यात आला असे उपविभागीय अधिकारी, भंडारा यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपीलाचा दिनांक ८.२.२०११ चा निर्णय त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २२.२.२०११ रोजी प्राप्त झाला व अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक २२.२.२०११

च्या पत्राने असे कळविले की, फॅमिली पर्टीकुलर प्रमाणपत्र कोणत्या कायद्यान्वये व कोणत्या नियमान्वये देण्यांत येते याबाबत विचारणा केल्यानुसार सदर कौटुंबिक विवरणपत्र देण्याबाबत शासनाचे कोणतही स्थायी आदेश नसून फक्त अर्जदार यांनी कौटुंबिक विवरणपत्र मिळण्याबाबत दिलेल्या अर्जानुसार व अर्जात जोडलेला हलफनामा, मृत्यू प्रमाणपत्र, मृतकाचे वारसानबाबत तलाठी स्थानिक चौकशी अहवाल यांच्या आधारे फॅमिली पर्टीकुलर प्रमाणपत्र देण्यांत येते. असे अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे निर्णयानुसार पुन्हा कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र शासनाचे कोणतेही स्थायी आदेश नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेली आहे. परंतु इतर आणखी कोणते आदेश आहे अगर कसे याची माहिती त्यांना मिळाली नाही. त्यावर जनमाहिती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कौटुंबिक विवरणपत्र देण्याबाबत शासनाचे कोणतेही स्थायी आदेश नाही किंवा त्या व्यतिरिक्त इतर स्वरुपाचे अस्थायी आदेश देखील नाही.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.१२.२०१० च्या पत्राने व दिनांक २२.२.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी कौटुंबिक पर्टीकुलर प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाचे कोणतेही स्थायी आदेश अगर इतर अस्थायी स्वरुपाचे आदेश नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक हाईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यांत येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी कौटुंबिक विवरणपत्र देण्याबाबत शासनाचे कोणतेही स्थायी आदेश नसून इतर कोणत्याही स्वरुपात अस्थायी आदेश देखील नाही असे स्पष्टपणे विनामुल्य अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५७/२०११.

श्री. मुखळीराम महादेव बोरकर,
द्वारा - के. टी. राऊत, गांधी वार्ड,
ब्रम्हपूरी रोड, ता. देसाईगंज,
जि. गडचिरोली - ४४१ २०७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गडचिरोली.

श्रीमती आर. टी. पिलारे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
प्रागतिक गर्ल्स हायस्कूल,
ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.६.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. बी. एम. राजनहिरे, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्रागतिक गर्ल्स हायस्कूल, देसाईगंज यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २४.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता.

... २

अपीलकर्ता यांनी एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९८९ ची असल्यामुळे सुमारे २२ वर्षाच्या माहितीचा शोध घेण्यात आला. परंतु शोध घेऊन कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १६.१२.२०१० च्या पत्राने एकूण ४ मुद्यांचे माहितीबाबतची वस्तुस्थिती कळविली. त्यानंतर अपीलकर्त्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १३.१.२०११ रोजी घेण्यात आली व त्या प्रथम अपीलाचे निर्णयात पुन्हा अपीलकर्त्यास १५ दिवसांचे आंत माहितीचा शोध घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती देण्याचे आदेश प्रथम अपीलाचे आदेशात देण्यात आले होते. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेण्यात आला. तथापी सदरची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक २४.१.२०११ च्या पत्राने असे कळविले की, दिनांक १३.१.२०११ रोजी प्रथम अपीलात झालेल्या सुनावणीतील निर्देशाप्रमाणे आपण मागितलेली माहिती या कार्यालयात शोधूनही सापडली नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधींनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे दाखल झाले होते. त्याची सुनावणी दिनांक १३.१.२०११ रोजी घेण्यात आली व त्यामध्ये १५ दिवसांत अपीलकर्त्याच्या माहितीचा शोध घेऊन माहिती देण्याचे निर्देश दिले होते. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा माहितीचा शोध घेतला. परंतु कोणतीही माहिती उपलब्ध झालेली दिसत नाही म्हणून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक २४.१.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध नसल्याबाबत कळविलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९८९ च्या

कालावधीतील आहें. सदरची माहिती ही २० वर्षापेक्षा जास्त कालावधीची असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी त्याचा शोध घेऊन त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केले व माहिती उपलब्ध नसल्याबाबत अपीलकर्त्यास दिनांक १६.१२.२०१० च्या पत्राने व दिनांक २४.१.२०११ च्या पत्राने स्पष्टपणे कळविल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४९३-४९५/१५.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५६/२०११.**

कु. ममता सिताराम भोस्कर,
मु. गिरोला, पो. तिरखेडा,
ता. सालेकसा, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. राम प्रभाकर जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय दंडाधिकारी,
ता. देवरी, जि. गोंदिया.

श्री. जे. डब्ल्यू. नंदेश्वर,
जनमाहिती अधिकारी तथा
अव्वल कारकून,
उपविभागीय अधिकारी,
ता. देवरी, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १७.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २०.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, ता. देवरी, जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन दिनांक १९.९.२००० रोजी पोलीस पाटलाचे नेमणुकीसाठी त्यांनी लेखी परीक्षा दिली. त्यानंतर दिनांक २४.९.२००० ला तोंडी परिक्षा दिली व दिनांक २७.९.२००० ला निकाल जाहीर झाला त्यात मी प्रथम क्रमांकावर आहे तरीपण मला आजपर्यंत नियुक्ती आदेश मिळालेले नाही याबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना

... २

जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २०.११.२०१० रोजी माहिती उपलब्ध झाली. त्या माहितीमध्ये असे नमुद केले की, सरपंच गिरोला व इतर यांनी कुमारी ममता भोस्कर या मौजा गिरोला येथे राहत नसल्याबाबत तक्रार सादर केली. त्यानुसार सविस्तर चौकशी करण्यात आली. मौजा गिरोला, ता. सालेकसा येथील दिनांक २.१०.२०१० रोजीचा ग्रामसभेचा ठराव प्राप्त झाला त्यानुसार आपण गिरोला या गावची मुलगी असून सन २००४ मध्ये लग्न होऊन गोंदिया येथे गेली असल्याचे कळविले आहे. आपणास संधी देऊन गिरोला येथील रहिवासी असल्याबाबत. ग्रामसेवक प्रमाणपत्र दाखल करु शकले नाही. म्हणून गिरोला येथील पोलीस पाटील पदावर आपली नियुक्ती करता येणार नाही. तसेच तुर्त हे पद भरता येणार नाही. पुढील पदे भरतांना या पदाची भरती करता येईल अशी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिली. मात्र त्यांना पोलीस पाटील नियुक्तीचे आदेश दिले नाही म्हणून त्यांनी उपविभागीय अधिकारी, ता. देवरी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी, ता. देवरी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक २०.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने मागितलेली माहिती अपीलकर्तीस दिनांक २०.११.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिली होती व त्या माहितीमध्यें अपीलकर्तीस असे कळविले की, आपण मौजा गिरोला, ता. सालेकसा या गावची मुलगी असून सन २००४ मध्ये लग्न होऊन गोंदिया येथे गेली असा ग्रामसभेचा ठरावानुसार कळविले आहे व चौकशी अंती ठाणेदार, पोलीस स्टेशन, सालेकसा यांच्या दिनांक ११.१०.२०१० च्या अहवालानुसार देखील लग्नानंतर आपण सासरगावी गोंविदपूर (गोंदिया) येथे राहत असल्याचे त्यांना पोलीस पाटील पदावर नियुक्ती करु नये तसेच आपणास संधी देऊनही गिरोला येथील रहिवासी असल्याबाबत आपण ग्रामसचिवांचा दाखल सादर करु शकले नाही म्हणून मौजा गिरोला येथील पोलीस पाटील पदावर आपली नियुक्ती करता येत नाही आणि पुढील जाहिरनामा काढून या पदाची भरती करता येईल असे अपीलकर्तीस स्पष्टपणे कळविल्याचे जनमाहिती अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. उपविभागीय अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, पोलीस पाटील नेमणूकीच्या संदर्भात ज्या गावचा पोलीस पाटील नेमावयाचा आहे त्या गावचा तो रहिवासी असल्याबाबत ग्राम सचिवांचा दाखला असणे आवश्यक असते. तसेच ग्रामपंचायत सभेने याबाबत दिनांक २.१०.२०१० रोजी ठराव करुन अपीलकर्तीची नेमणुक पोलीस पाटील म्हणून करु नये. कारण त्या गावात राहत नाही असे कळविल्यामुळे त्यांची नेमणुक पोलीस पाटील पदावर करता येत नाही असे आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्ती, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीस जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.११.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी पोलीस पाटील पदाच्या नेमणुकीची बाब आयोगाचे कार्यकक्षेत येत नाही म्हणून अपीलकर्तीचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४९६-४९८/१५.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५९/२०११.**

श्री. प्रकाश रामचंद्र पडगेलवार,
विठ्ठल मंदिर वार्ड,
कोवळे वकील यांचे घराजवळ,
ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, चंद्रपूर.

श्री. एम. आर. शेख,
जनमाहिती अधिकारी तथा
आस्थापना लिपिक,
नगर परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. प्रकाश खोब्रागडे, नगर अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने कर्मचाऱ्यांच्या सेवे संबंधीची माहिती विस्तृत प्रमाणात मागितलेली होती. त्यामध्ये जकात विभागात कार्यरत स्थायी/अस्थायी कर्मचाऱ्यांची माहिती व

... २

विभागातील होणाऱ्या खर्चाची माहिती त्यावर सादर केलेली टिपणीची प्रत इत्यादी संबंधात आणि पाचवा वेतन आयोग मंजूर व सुधारित वेतन श्रेणी लागू केली असलेल्या कर्मचाऱ्यांची माहितीबाबत मुद्या क्रमांक अ ते ई असे एकूण ५ मुद्यांवर त्यांनी विस्तृत माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही १५ ते २० वर्षे जुनी असल्यामुळे सदरचा अभिलेख हा अभिलेख कक्षात जमा करण्यात आलेला असून आपण कार्यालयीन वेळेत उपस्थित झाल्यास आपले अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल व अपेक्षित असलेली माहिती विहित शुल्क आकारुन पुरविण्यात येईल असे अपीलकर्त्यास दिनांक २१.१२.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्याचे सुनावणीत नमुद केले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्या बाबतची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली. मात्र अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात पाहिजे असलेल्या माहितीचे अवलोकन करण्यासाठी हजर झाले नाही. नंतर त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी, नगर परिषद, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १२.१.२०११ रोजी दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.१.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये मुख्याधिकारी यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अभिलेख कक्षात जमा केलेला रेकार्ड अपीलार्थीस पुन्हा एकदा अवलोकनासाठी द्यावा व त्यानंतर अपीलार्थीचे मागणीनुसार त्यांना अपेक्षित असलेली माहिती या आदेशापासून ७ दिवसांचे आंत पुरवावी असा प्रथम अपीलाचा निर्णय मुख्याधिकारी यांनी दिला. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.२.२०११ रोजी असे कळविले की, आपले प्रथम अपील आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे संबंधित माहितीचा अभिलेख आपले अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात येईल व अपेक्षित असलेली माहिती विहित शुल्क आकारुन आपणास पुरविण्यात येईल. तरी सदरंचे पत्र प्राप्त होताच ३ दिवसांचे आंत अभिलेख कक्षात उपस्थित होऊन तसा अहवाल अभिलेख लिपिकामार्फत सादर करावा. त्यानंतर अपीलकर्ता हे अभिलेख कक्षात दिनांक ४.२.२०११ ते दिनांक ९.२.२०११ या कालावधीत हजर राहून या रेकॉर्डची पाहणी केली व त्यांना आवश्यक असलेल्या दस्ताऐवजांना त्यांनी पताका लावून दिल्या त्यानुसार अपीलकर्त्यास हवी असलेल्या माहितीचे शुल्क रुपये ३६६/- भरण्याबाबत अपीलकर्त्यास दिनांक १३.४.२०११ च्या पत्राने कळविले. सदरचे शुल्क भरण्याचे पत्र अपीलकर्त्यास दिनांक १८.४.२०११ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. तरी देखील अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही

असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र देऊन देखील व सदरचे पत्र त्यांना प्राप्त होऊनही त्यांनी माहितीचे शुल्क न भरता पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यास त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क जनमाहिती अधिकारी यांचेकडे भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

२) अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १३.४.२०११ च्या पत्राने कळविल्यानुसार माहितीचे शुल्क रुपये ३६६/- जनमाहिती अधिकारी यांचेकडे भरणा करावा व त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/४९९-५०१/१५.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५८/२०११.

श्री. केशव गोपाळा राऊत,
मु. पो. नगरधन, ता. रामटेक, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(पंचायत) जिल्हा परिषद, नागपुर.

जनमाहिती अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, रामटेक, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्रीमती रमा भस्मे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. सलामपुरे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, रामटेक यांचेकडे ग्रामपंचायत, नगरधन येथील आर्थीक घोटाळयाची चौकशीची प्रमाणित प्रत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी अपीलाची माहिती मला मिळाल्यामुळे अपील मागे घेत आहे असे लेखी निवेदन आयोगाकडे सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/५०२/१५.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३३६/२०११.**

श्री. रविंद्र शालीकरामजी बहेकार,
मु. जानवा, पो. इटखेडा,
ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सी. एन. इंगळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गटप्रमुख, जिल्हा सुविधा चमु,
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जलस्वराज प्रकल्प,
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. आर. एस. बनसोड,
जनमाहिती अधिकारी तथा
वरिष्ठ सहाय्यक,
जलस्वराज प्रकल्प,
जिल्हा परिषद, गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही म्हणून सदरची सुनावणी आज दिनांक १६.६.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जलस्वराज प्रकल्प जानवा येथे शासनाकडून मंजूर निधी, शासनाकडून प्राप्त अनुदान, संपूर्ण केलेल्या कामाची

... २

माहिती, साहित्य खरेदीचे पावती, इतर खर्च पावती, मजूरांच्या हजेरीपटाची झेरॉक्स इत्यादी माहिती मागितलेली होती. परंतु त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील गट प्रमुख जिल्हा सुविधा चमू, जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. त्यामध्ये १० दिवसांत अध्यक्ष व सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समिती यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. मात्र त्यानंतरही त्यांना अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समिती, जानवा यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही ग्रामपातळीवरची असल्यामुळे सदरच्या माहितीचा अर्ज त्यांनी दिनांक २.११.२०१० च्या पत्राने अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समिती, ग्रामपंचायत जानवा, ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया यांचेकडे हस्तांतरण करुन अपीलकर्त्यास माहिती १५ दिवसात देण्यात यावी असे कळविले व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना पाठविण्यात आली व त्यामध्ये सदरची माहिती अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचे मार्फत प्राप्त करुन घ्यावी असे देखील कळविले. तथापी त्यांना ग्रामपातळीवर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील गट प्रमुख, जिल्हा सुविधा चमू यांचेकडे दाखल केल्याचे आयोगासमोर सांगितले. या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १४.१.२०११ रोजी प्रथमतः ठेवली होती. त्यानंतर पुन्हा दुसरी सुनावणी दिनांक २७.१.२०११ रोजी ठेवण्यात आली व त्या आदेशाप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित करुन अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी अपीलकर्त्यास १० दिवसांत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. तथापी त्यानंतरही अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती उपलब्ध झालेली नाही.

४. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीच्या झेरॉक्स त्यांचे समक्ष अपीलकर्त्यास देण्यासाठी त्यांच्या प्रती काढण्यात आल्या होत्या. मात्र अध्यक्ष/सचिव यांनी अपीलकर्त्यास त्या झेरॉक्स प्रती पुरविलेल्या दिसून येत नाही.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही ग्रामपातळीवरील असल्यामुळे सदरची माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाकडे अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जानवा यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटप्रमुख, जिल्हा सुविधा चमू यांनी अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जानवा यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी व ७ दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास सदरची माहिती त्यांचे मार्फत विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/GBVDH/५०३- ५०५/१६.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७१/२०११.

श्री. राधेश्याम परसरामजी काबरा,
ता. देसाईगंज, जि. गडचिरोली - ४४१ २०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. जी. ऊईके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय,
ता. जि. गडचिरोली.

श्री. आ. कि. गजभिये,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअधिक्षक,
भुमी अभिलेख कार्यालय, ता. देसाईगंज (वडसा),
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भुमी अभिलेख, देसाईगंज यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २१.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जात अपीलकर्त्याने एकूण २३ मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन

... २

जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.१०.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास एकूण २३ मुद्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली तथापी ज्या मुद्यांची माहिती अभिलेख स्वरुपात पुरविता येत नाही त्या मुद्यांची वस्तुस्थिती देखील अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. तसेच सदरची माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी पोस्टाने पाठविल्याचा पुरावा सुनावणीत आयोगासमोर दाखविला. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, गडचिरोली यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. परंतु अपीलकर्ता प्रथम अपीलाचे सुनावणीस गैरहजर राहिले. तथापी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.१२.२०१० रोजी देण्यात आला आणि त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.१०.२०१० चे पत्रान्वये अर्जदारास उपलब्ध माहिती देऊन काही मुद्यांच्या त्रुटयांचे पुर्तताकामी कळविले असून त्यानुसार अर्जदार श्री. राधेश्याम काबरा यांनी त्रुटयांची पुर्तता तसेच सहकार्य केले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती दिनांक २८.१२.२०१० रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविली. त्यानंतर पुन्हा अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात अभिलेखाचे अवलोकन करण्यासाठी आले व त्यानंतर त्यांनी मागणी केलेली माहिती पुन्हा दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १८.१०.२०१० च्या पत्राने त्याचप्रमाणे दिनांक २८.१२.२०१० च्या पत्राने व दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७२/२०११.

श्री. राधेश्याम परसरामजी काबरा,
ता. देसाईगंज, जि. गडचिरोली - ४४१ २०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. जी. ऊईके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय,
ता. जि. गडचिरोली.

श्री. आ. कि. गजभिये,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअधिक्षक,
भुमी अभिलेख कार्यालय, ता. देसाईगंज (वडसा),
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भुमी अभिलेख, देसाईगंज यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १४.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जात अपीलकर्त्याने एकूण ८ मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन

... २

जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १३.१०.२०१० च्या पत्राने एकूण ८ मुद्यांबाबत मुद्येनिहाय माहितीबाबतची वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये असे नमुद केले की, सदरची माहिती कार्यालयात उपलब्ध असून आपण अर्जात नमुद केल्याप्रमाणे कार्यालयात येऊन उपलब्ध दस्ताऐवजाचे अवलोकन करावे व नियमानुसार विहित फीचा भरणा करुन आपणास हवी असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध नाही त्यांची वस्तुस्थिती देखील अपीलकर्त्यास मुद्येनिहाय कळविण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले असल्याचे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, गडचिरोली यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. तथापी प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.१२.२०१० रोजी देण्यात आला. त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.१०.२०१० च्या पत्राने उत्तर कळविले आहे. सदर पत्रानुसार अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर होऊन अभिलेखाची पाहणी अगर फी चा भरणा केला नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आणखी असेही सांगितले की, प्रथम अपीलाचे निर्णयानंतर अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती दिनांक २८.१२.२०१० च्या पत्राने रजिस्टर पोस्टाने अपीलकर्त्यास पाठविली. त्यानंतर अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले. त्यांनी अभिलेखाचे अवलोकन केले व अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर त्यांना पाहिजे असलेली माहिती दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास पुन्हा उपलबध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी

... ३

असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.१०.२०१० च्या पत्राने तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर दिनांक २८.१२.२०१० च्या पत्राने व अपीलकर्त्याने माहितीचे अवलोकन केल्यानंतर दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३६९/२०११.

श्री. सुदाम श्रीराम बाराहाते,
१४, मिलींद सोसायटी, नरेंद्रनगर,
नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अवर सचिव (विधी)
विधी व न्याय विभाग (नोटरी)
मंत्रालय, मुंबई - ३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक (विधी),
विधी व न्याय विभाग (नोटरी)
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपीलकर्ता यांचे वतीने श्री. आवळे हे बाजू मांडणार आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे श्री. संजय देशभ्रतार, अवर सचिव (विधी), विधी व न्याय विभाग, नागपूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी विधी व न्याय विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ॲड. एम. खंडाळ, जि. नागपूर यांची नियुक्ती नोटरी यापदावर महाराष्ट्र शासनद्वारा करण्यात आली त्याचा सेवेचा कार्यकाळ. तसेच श्री.

... २

खंडाळ, नोटरी यांचेकडील दस्ताऐवज नोंदणी रजिस्टर मधील दिनांक २५.५.२००३ रोजीचा नोंदणीचा उतारा, रजिस्टर मधील झेरॉक्स साक्षांकित प्रत मिळण्यात यावी अशी त्यांनी माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १९.१०.२०१० च्या पत्राने अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, श्री. मदन बी. खंदार, नोटरी यांची दिनांक २६.१०.१९९९ रोजी नोटरी म्हणून नियुक्ती झाली असून त्यांचे नोटरी प्रमाणपत्र नुतनीकरणाच्या अधीन राहून दिनांक २६.१०.२०१२ पर्यंत वैध राहील. आपणांस पाहिजे असलेल्या दिनांक २५.५.२००३ च्या नोटरी रजिस्टरची साक्षांकित प्रत आपल्याला योग्य ते शुल्क भरुन देण्याबाबत श्री. खंदार यांना निर्देश देण्यात येत आहेत. वरील प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती प्राप्त झाली व मुद्या क्रमांक २ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अवर सचिव, (विधी) याचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्याने श्री. खंदार, नोटरी यांना नोटरी रजिस्टर मधील दिनांक २५.५.२००३ चा उतारा मिळण्यासाठी नोटरीकडे पाठपुरावा करावा म्हणून प्रथम अपील निकाली काढण्यात आल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. श्री. खंदार, नोटरी कडून दिनांक २५.५.२००३ च्या रजिस्टरमधील उतारा मिळाला नाही म्हणून अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. उत्तरवादी यांचे प्रतिनिधीनी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जनमाहिती अधिकारी विधी व न्याय विभाग, (नोटरी शाखा) मंत्रालय, मुंबई यांचेशी संबंधित असल्याने त्यांनी दिनांक २.९.२०१० रोजी सदरचा अर्ज त्यांचेकडे हस्तांतरण करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले व त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास पाठवून त्यांचेशी पाठपुरावा करण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर जनमाहिती अधिकारी विधी व न्याय विभाग, मुंबई यांनी अपीलकर्त्यास दिनांक ९.९.२०१० रोजी पत्र पाठवून असे कळविले की, महाराष्ट्र शासनाने श्री. मदन बी. खंदार (नोंदणी क्र. १०१३) यांची नोटरी म्हणून नागपूर जिल्हयातील कळमेश्वर तालुक्याकरिता नेमणूक केली आहे. तथापी आपण आपल्या माहितीच्या अर्जात ॲड. एम. खंडाळ असे नांव नमुद केले असून अशा नावांने नागपूर विभागात नेमणूक केलेले नोटरी नसल्याने आपल्याला माहिती हवी असलेले श्री. खंडाळ व विभागाने नियुक्त केलेले श्री. खंदार हे एकच आहेत किंवा कसे

याबाबत प्रथमतः उलटटपाली माहिती देण्यात यावी. त्यानंतर आपणास हवी असलेली माहिती देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (विधी), विधी व न्याय विभाग, मुंबई यांनी अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने दिनांक ९.१०.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांना असे कळविले की, दिनांक २.९.२०१० च्या माहिती अर्जातील नोटरी श्री. एम. खंडाळ असे लिहीले होते याची दुरुस्ती येणेप्रमाणे श्री. मदन बी. खंदार असे समजावे असे अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांना कळविले. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १९.१०.२०१० च्या पत्राने श्री. मदन बी. खंदार, नोटरी यांची माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र श्री. मदन बी. खंदार यांचे कडील दिनांक २५.५.२००३ हया नोटरी रजिस्टरची साक्षांकित प्रत आपल्याला योग्य ते शुल्क भरुन देण्याबाबत श्री. खंदार यांना निर्देश देण्यात येत आहेत. असे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली व श्री. मदन बी. खंदार, नोटरी यांना असे कळविले की, आपल्या नोटरी रजिस्टर मधील दिनांक २५.५.२००३ रोजीचा उतारा साक्षांकित करुन योग्य ते शुल्क घेऊन अपीलकर्त्यास देण्यात यावा. त्यानंतर अपीलकर्त्याने श्री. मदन बी. खंदार यांचेकडे दिनांक २५.५.२००३ चा नोटरी रजिस्टर मधील उताऱ्याची मागणी केली. तथापी त्यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचेवतीने उपस्थित झालेले प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक २.९.२०१० चा माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ९.९.२०१० व दिनांक १९.१०.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी अपीलकर्त्यास श्री. मदन बी. खंदार, नोटरी यांचेकडील दिनांक २५.५.२००३ च्या नोटरी रजिस्टरची साक्षांकित प्रत त्यांना अद्याप मिळालेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सदरची प्रत उपलब्ध करुन देण्याच्या सुचना श्री. मदन बी. खंदार यांना दिनांक १९.१०.२०१० च्या पत्राने व दिनांक १.११.२०१० च्या पत्राने दिलेल्या दिसून येतात. तथापी अद्यापही अपीलकर्त्यास श्री. मदन बी. खंदार, नोटरी यांचेकडून ती माहिती प्राप्त झालेली दिसून येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा श्री. मदन बी. खंदार यांना दिनांक २५.५.२००३ च्या नोटरी रजिस्टरमधील उताऱ्याची प्रत साक्षांकित करुन उपलब्ध करुन देण्याची सुचना निर्गमित करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ४

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी श्री. मदन बी. खंदार, नोटरी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २५.५.२००३ च्या नोटरी नोंदी रजिस्टर मधील नोंदीच्या उताऱ्याची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना द्यावी व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७०/२०११.**

श्रीमती पुष्पा डी. सुद,
द्वारा - सुदविझन, ४१०/४,
पहिला माळा, लुंम्बिनीं नगर,
मेकोसाबाग जवळ, नागपूर - ४४० ००४. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. पी. टी. वाकोडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
सेंट्रल एव्हेन्यू रोड, (मेयो), नागपूर - ४४० ०१८.

श्री. एस. व्ही. मडावी,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
सेंट्रल एव्हेन्यू रोड, (मेयो), नागपूर - ४४० ०१८. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती यांचेवतीने ॲड. एस. आर. माटा उपस्थित आहेत तसेच उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांचेवतीने उपस्थित असलेले ॲड. एस. आर. माटा यांनी असे सांगितले की, त्यांनी दिनांक २८.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, इंदिरा गांधी शासकीय महाविद्यालय,

नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांचे कालबध्द पदोन्नतीच्या संदर्भात दिनांक ३१.७.२००७, दिनांक २६.९.२००७, दिनांक ८.१०.२००७, दिनांक १९.५.२००७, व दिनांक ९.१२.२००९ चे अर्ज अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय महाविद्यालय, नागपूर यांचेकडे सादर केलेले होते. त्या पाचही अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात व इतर अर्जाचे संदर्भात माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय महाविद्यालय, नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व निर्णयही त्यांना प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे ॲड. माटा यांनी सुनावणीत आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्तीस विहित मुदतीत माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी असे ॲड. माटा, वकील यांनी सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक २८.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २९.११.२०१० रोजी प्राप्त झाला होता. परंतु त्यावेळी त्यांचेकडे विधान मंडळ अधिवेशन कामकाजाचे तसेच अंदाज समिती भेट व मेडीकल कौन्सिल तपासणी तसेच विधान सभा/परिषद प्रश्न व बदल्या इत्यादी कामे मोठया प्रमाणावर असल्यामुळे ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्तीस त्यांचेकडून माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. त्यानंतर त्यांनी दिनांक १३.६.२०११ च्या पत्राने अपीलकर्तीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे नमुद केले. मात्र दिनांक १३.६.२०११ च्या पत्राने दिलेली माहिती त्यांच्या दिनांक २८.११.२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जाची दिसून येत नाही. कारण माहितीचे अधिकारात मागितलेली माहिती ही त्यांचे कालबध्द पदोन्नती संदर्भातील दिसून येते. म्हणून अपीलकर्तीस दिनांक २८.११.२०१० च्या माहिती अर्जात मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला दिसून येत नाही.

४. अपीलकर्तीचे ॲड. माटा व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीचा दिनांक २८.११.२०१० च्या माहिती अर्जातील कोणतीही माहिती जनमाहिती

अधिकारी यांनी अपीलकर्तीस ३० दिवसांचे मुदतीत उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्तीस माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला दिसून येतो. सदरच्या विलंबास जनमाहिती हे जबाबदार दिसून येतात. विलंबाबद्यल त्यांनी वर नमुद केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस त्यांच्या दिनांक २८.११.२०१० च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांनी अपीलकर्तीस दिनांक २८.११.२०१० च्या माहिती अर्जातील माहिती ३० दिवसांचे मुदतीत दिली नाही. तसेच माहिती उपलब्ध करण्यास विलंब झालेला दिसून येतो. या विलंबास जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) सदरच्या शास्तीची रक्कम अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांनी वसूल करावयाची आहे.

४) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांनी त्यांचेकडे प्रथम अपील दाखल झाल्या नंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) अन्वये त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही म्हणून याबाबत तत्कालीन अधिष्ठाता यांना सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात याची पुनर्रावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

५) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३६८/२०११.

श्री. अनिल श्रीराम माणकीकर,
द्वारा - श्री. संत गजानन महाराज मंदीर,
मोठया पोंस्टाचे पाठीमागे, लहानुजी नगर,
वर्धा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
संवसु विभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
वर्धा.

श्री. जी. सी. चव्हाण,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
संवसु विभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. व्ही. एस. पाथोडे, कनिष्ठ व्यवस्थापक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, संवसु विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, वर्धा यांचेकडे स्वतःच्या वैयक्तिक सेवापुस्तकेतील रजेच्या

हिशोबाची सत्यप्रती सन १९७२-७३ ते सन २००८-२००९ पर्यंतची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.६.२०११ रोजी आवश्यक कागदपत्रे पुरविण्यात आली त्यामुळे त्यांच्या सर्व मागण्या पूर्ण केल्यामुळे केस क्रमांक ३६८/११ ही मागे घेण्याची विनंती करण्यात येत आहे असे आपसी समझोता पत्र सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७९/२०११.

श्री. मनोहर धकाते,
अचलेश्वर वार्ड,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, सिव्हील लाईन,
नागपूर.

सौ. कविता बुटले,
जनमाहिती अधिकारी तथा
निरिक्षक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, सिव्हील लाईन,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा निरिक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर

... २

मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग यामधील कर्मचाऱ्यांना नियुक्ती/पदोन्नतीसाठी जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्या संदर्भात एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १४.१२.२०१० च्या पत्राने असे कळविण्यात आले की, आपणास पुरवठा करण्याकरिता या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तयार आहे. उपलब्ध माहिती एकूण पाने २६८ असून त्याचे शुल्क ५३६/- रुपये व पोस्टाचा खर्च रुपये २५/- असे एकूण रुपये ५६१/- शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. मात्र सदरचे शुल्क जास्त असल्यामुळे त्यांनी शुल्काचा भरणा केला नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा निरिक्षक यांनी आयोगासमोर सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्याला माहितीचे एकूण शुल्क रुपये ५६१/- पोस्टाचे शुल्कासह भरण्याबाबत कळविले. मात्र अपीलकर्त्याने शुल्काची रक्कम भरणा न केल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी काढण्यात आली असून त्याबाबतचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र विहित मुदतीत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पाठविले होते. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना संपूर्ण २६८ पेजेसच्या माहितीची आवश्यकता नाही. तथापी त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरण्याची तयारी त्यांनी आयोगाकडे दाखविली. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून आवश्यक असलेल्या दस्ताऐवजांचे निरिक्षण करुन घेऊन निरिक्षणाअंती पाहिजे असलेली माहिती फी भरुन प्राप्त करुन घ्यावी. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन घ्यावे व निरिक्षणाअंती त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंतर अपीलकर्त्यास माहिती त्वरित उपलब्ध करुन द्यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५२१- ५२३/१७.६.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७८/२०११.

श्री. मनोहर धकाते,
अचलेश्वर वार्ड,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. जे. गणराज,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
प्रधान मुख्य वनसंरक्षक,
म. रा. वनभवन, सिव्हील लाईन,
नागपूर - ४४० ००१.

श्री. जी. टी. कऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, (कक्ष - १३)
प्रधान मुख्य वनसंरक्षक,
म. रा. वनभवन, सिव्हील लाईन,
नागपूर - ४४० ००१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष-१३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली

... २

अर्ज सादर करुन दिनांक ७.१०.१९८० पासून दिनांक १८.११.२००३ पर्यंत या कालावधीत सरळ सेवेने भरती करण्यात आलेल्या तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांबाबत एकूण ४ मुद्यांची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.११.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २५.११.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९८० ते २००३ या कालावधीची मागितलेली होती. म्हणून सुमारे ३० वर्षा पुर्वीची माहिती अपीलकर्त्याने मागितलेली होती. सदरची माहिती ही वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांची सरळ सेवा भरतीबाबत प्रवर्ग निहाय मागितलेली होती. त्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची व्याप्ती ही मोठी असल्याने व माहिती क्लिष्ट स्वरुपाची असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक २३.१२.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास १ ते ४ मुद्यांबाबतची वस्तुस्थिती कळवून असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीत स्पष्टता नसून क्लिष्ट स्वरुपाची व ती एकमेकाच्या संदर्भात ताळमेळ नसणारी दिसून येत आहे. म्हणून आपण त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या नस्तीचे अवलोकन करुन आवश्यक ती असलेली माहिती कार्यालयात उपस्थित राहून प्राप्त करुन घ्यावी जेणे करुन आपणास निश्चित असलेली माहिती उपलब्ध करुन देणे जास्त सोईचे होईल. तरी आपण कार्यालयात उपस्थित राहण्याची तारीख आणि वेळ कळवावी असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्येनिहाय वस्तुस्थिती नमुद करुन कळविलेले होते. परंतु अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात माहितीचे अवलोकन करण्यासाठी उपस्थित झाले नाही.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील प्रशासकीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. सुनावणीनंतर प्रथम अपीलाचा असा निर्णय दिला की, प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालयाच्या अधिनस्त कक्ष - १३ कडून सरळसेवेने चतुर्थश्रेणी मध्ये शिपाई व तृतीय

श्रेणीमध्ये लिपिक, लेखापाल, वाहन चालक इत्यादी पदांवर सरळसेवेद्वारे भरती केल्या जाते. त्याची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा दिनांक ७.२.२०११ रोजी निर्णय देण्यात आला. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली वर्ग-३ व वर्ग-४ ची माहिती दिनांक १५.२.२०११ च्या पत्राने रजिस्टर पोस्टाद्वारे पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांनी सेवाजेष्ठता यादीची प्रत मिळाली आहे. परंतु बाकी माहिती त्यामध्ये नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यास जी सेवाजेष्ठता यादी पुरविलेली आहे. त्यामध्ये नियुक्तीचा दिनांक व इतर तपशील त्यामध्ये नमुद केलेला आहे व तो तपशील आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दाखवून दिला. तसेच जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जश्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २३.१२.२०१० च्या पत्राने व दिनांक १५.२.२०११ च्या पत्राने त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५२४- ५२६/१७.६.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७७/२०११.

श्री. मनोहर धकाते,
अचलेश्वर वार्ड,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
जुना आग्रा रोड, आदिवासी विकास भवन समोर,
नाशिक वनवृत्त, नाशिक - ४२२ ००२.

श्री. सी. एन. बडगुजर,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
जुना आग्रा रोड, आदिवासी विकास भवन समोर,
नाशिक वनवृत्त, नाशिक - ४२२ ००२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, मुख्य वनसंरक्षक(प्रा.), नाशिक वनवृत्त, नाशिक यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मुख्य वनसंरक्षक (प्रा) नाशिक वनवृत्त या कार्यालयांतर्गत भारतीय वन सेवा व महाराष्ट्र वन

सेवा या संवर्गात कार्यरत असलेल्या विविध पदांवरील अधिकाऱ्यांना त्यांनी केलेल्या प्रशासकीय, वित्तीय, न्यायिक अथवा क्षेत्रीय अनियमिततेबाबत माहिती मागितलेली होती. तसेच अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग यामधील कर्मचाऱ्यांना जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे संदर्भात दोन मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्रमांक २ ची माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय विहित मुदतीत देण्यात आला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २९.१०.२०१० रोजी पोस्टाने प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयातील कक्ष अधिकारी-१ यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडून ती माहिती मागविली. सदरची माहिती त्यांचे कडून प्राप्त झाल्यानंतर दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १ ची माहिती देण्यात आली व मुद्या क्रमांक २ ची माहिती अपीलकर्ता यांना कक्ष अधिकारी-१ यांनी दिनांक १८.११.२०१० रोजी परस्पर उपलब्ध करुन दिली. वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर मान्य केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत दिला नाही म्हणून त्यांचेवर कार्यवाही करावी असे त्यांनी नमुद केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपीलकर्त्याचा दिनांक २९.११.२०१० चे प्रथम अपील दिनांक १४.१२.२०१० रोजी प्राप्त झाले होते. त्याचा निर्णय दिनांक ७.३.२०११ रोजी देण्यात आला. वास्तविक पाहता प्रथम अपील दिनांक १४.१२.२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर दिनांक १४.१.२०११ पर्यंत प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक होते. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.३.२०११ रोजी दिलेला दिसतो. म्हणून याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी भविष्यात प्रथम अपीलाचा निर्णय विहित मुदतीतच देण्यात यावा याची त्यांना समज देण्यात येते.

५. तथापी अपीलकर्त्यास दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५२७- ५२९/१७.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३८०/२०११.**

श्री. मनोहर धकाते,
अचलेश्वर वार्ड,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. के. वरखेडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
नागपूर शहर, नागपूर.

श्री. प्रभाकर शिवराम ठवकर,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
नागपूर शहर नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, नागपूर शहर, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन राजस्व मामला क्रमांक ११३/एमआरसी-८१, दिनांक १९.१०.१९७४ श्री. मनोहर जगन्नाथ गणराज व राजस्व मामला क्रमांक १६६/एमआरसी-८१/१९७७-७८, दिनांक २५.१.१९७८ श्री. प्रभाकर आनंदराव चव्हाण या

... २

उमेदवारांना ज्या कागदपत्राचे आधारे जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले त्या सर्व कागदपत्राची प्रमाणित झेरॉक्स प्रती मागितलेल्या आहेत. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ५.१.२०११ रोजी असे कळविले की, नायब तहसीलदार, कोर्ट क्र. १ ते ५ कोर्टातून जात प्रमाणपत्र निर्गमित झाल्यामुळे अहवालाकरिता पत्र पाठविले असता कोर्ट क्र. १, ३ व २, ४, ५ मध्ये त्यावर्षाचे रजिस्टर उपलब्ध नसल्यामुळे आपण मागितलेले दस्ताऐवजाची माहिती पुरविणे शक्य नाही असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसीलदार, नागपूर शहर, नागपूर यांचेकडे दिनांक १०.१.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन दिनांक २३.२.२०११ रोजी निर्णय देण्यात आला व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात नायब तहसीलदार कोर्ट क्र. १ ते ५ व अभिलेखागार, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे शोघ घ्यावा व प्रकरण उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी. असा प्रथम अपीलाचा निर्णय दिल्यानंतरही त्यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयात प्राप्त झाला होता. त्यांनी वर नमुद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली होती. म्हणून सदर माहितीच्या अनुषंगाने तहसील कार्यालयातील कोर्ट क्रमांक १ ते ५ संबंधातील लिपिक कु. मंदा मडावी, सौ. एन. डी. नंदेश्वर, श्रीमती बी. बी. झोडापे यांना माहिती सादर करण्यास दिनांक २३.१२.२०१० अन्वये कळविण्यात आले होते. त्यांनी वरील प्रकरणाचा तसेच संबंधित रजिस्टरचा शोध घेतला असता त्यांना त्या संबंधीचे रजिस्टर व वरील प्रकरण उपलब्ध झाले नसल्याचे त्यांनी लेखी सादर केले. त्यानुसार अपीलकर्त्यास दिनांक ५.१.२०११ च्या पत्राने माहिती पुरविणे शक्य नसल्याचे कळविण्यात आले असे जनमाहिती अ धिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने तहसीलदार, नागपूर शहर, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.२.२०११ रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाचा निर्णय त्यांच्या कार्यालयाकडे

दिनांक २४.५.२०११ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर पुन्हा दिनांक १०.६.२०११ च्या पत्राने अभिलेखागार, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांना पत्र लिहून अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती त्यांच्या अभिलेखागारात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याबाबत कळविण्यात आले. त्यांनी त्यांच्या अभिलेखागारात या प्रकरणाचा शोध घेतला. तथापी त्यांना देखील अभिलेखागारात सदरचे प्रकरण उपलब्ध झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक १३.६.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी, नागपूर यांना माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्त्यास दिनांक १५.६.२०११ च्या पत्राने असे कळविले की, या कार्यालयातील कोर्ट क्र. १ ते ५ व अभिलेखागार, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे आपण मागितलेल्या माहितीचा प्रकरणाचा पुन्हा शोध घेतला असता प्रकरण उपलब्ध झाले नाही. म्हणून आपण मागितलेली माहिती आपणास पुरविण्यात येत नाही असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा कळविल्याचे आयोगाचे समोर सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९७४ ते १९७८ या वर्षाची आहे. सदरची माहिती ही ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीची असल्यामुळे या प्रकरणी शोध घेऊनही ते प्रकरण प्राप्त झाले नाही.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९७४ ते १९७८ या कालावधीची म्हणजे सुमारे २० वर्षापेक्षा जास्त कालावधीची जुनी माहिती आहे. जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात तसेच जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयातील अभिलेखागारात देखील माहितीच्या प्रकरणाचा शोध घेण्यात आला. परंतु शोध घेऊनही सदरचे प्रकरण प्राप्त न झाल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होऊ शकत नाही असे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७३/२०११.

श्री. गोविंद सदाशिव मेश्राम,
प्लॉट नं. २९, शक्तीमातानगर,
खरबी रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
शिक्षण विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
शिक्षण विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी तर्फे श्री. टी. आर. रामटेके, लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, महानगरपालिका नागपूर यांचेकडे दिनांक २५.१.२००८ ला एकूण २४ शिक्षकांनी सेवाजेष्ठता यादीवर आक्षेप घेतला होता. त्याबाबत एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता

यांनी दिनांक १५.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे लेखी निवेदन सादर करुन मला माहिती पाहिजे होती त्या समस्येचे निराकरण करण्यासंबंधीची कार्यवाही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व अपीलीय अधिकारी महानगरपालिका यांनी कार्यवाही सुरु केलेली आहे व लवकरात लवकर शिघ्रगतीने समस्या हल करण्याचे आश्वासन दिलेले आहे. म्हणून वरील विषयांचे अपील रद्य करण्यात यावे अशी विनंती केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३८५/२०११.

श्री. कृष्णपद कुटीश्वर मंडल,
जयनगर, पो. सोनापूर,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. एस. शेंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (आरोग्य)
पंचायत समिती, चामोर्शी,
जि. गडचिरोली.

श्री. ए. व्ही. उंदीरवाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, विक्रमपूर,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, विक्रमपूर, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जलस्वराज प्रकल्पांतर्गत केलेल्या बांधकामाचे प्रशासकीय अंदाजपत्रक,

... २

एम.बी.रेकॉर्ड, मटेरिअल स्टेट रिपोर्ट, साहित्य खरेदी बील इत्यादी माहिती मागितली होती. ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना मोफत माहिती मिळावी म्हणून विनंती केली होती. तथापी त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी, पंचायत समिती, चामोर्शी यांचेकडे दिनांक १.१२.२०१० रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ३.११.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत मागितलेली माहिती ही विस्तृत व मोठया प्रमाणात होती. तसेच अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात ते दारिद्रय रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र जोडले होते. त्यामुळे अपीलकर्त्याने विनामुल्य माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने केलेल्या माहितीच्या अर्जातील नाव व बीपीएल च्या दाखल्यातील नाव यामध्ये फरक दिसून आला. कारण माहितीच्या अर्जात अर्जदार म्हणून श्री. किष्णो कुटीलाल मंडल असे नांव होते. तर बीपीएल च्या दाखल्यात कृष्णपद कुटिस्वर मंडल असे नांव होते. या नावात फरक असल्यामुळे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.११.२०१० रोजी पत्र देऊन आपल्या माहिती अर्जातील नांव व बीपीएल मधील दाखल्याचे नांव यात फरक आहे म्हणून आपणास मोफत माहिती देता येणार नाही म्हणून माहिती शुल्क रुपये २६९०/- जमा करण्यात यावे किंवा बीपीएलमध्ये नाव असल्याप्रमाणे सुधारित माहितीचा अर्ज सादर करावा म्हणजे माहिती उपलब्ध करुन देता येईल. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही किंवा सुधारित अर्ज देखील सादर केलेला नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्त्याने सादर केलेल्या माहिती अर्जातील नांव व बीपीएल दाखल्यातील नांव यांचे अवलोकन केले असता त्यामध्ये तफावत दिसून येते. याबाबत अपीलकर्त्याने सुनावणीत असे नमुद केले की, ते माहितीचे शुल्क भरण्यास तयार आहेत. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या शुल्काचे भरणा करुन आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीचे शुल्काचे पैशाचा भरणा हा आदेश मिळाल्यापासून ८ दिवसांत करावा व अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसांचे आंत अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५३६- ५३८/१८.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३८८/२०११ व अपील क्रमांक ३८९/२०११.**

श्री. विजय शामराव रंगारी,
मु. चिकना, पो. बारव्हा,
ता. लाखांदूर, जि. भंडारा.

श्री. भास्कर मारोती बावनथरे,
मु. खोलमारा (नविन), पो. बारव्हा,
ता. लाखांदूर, जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. दुपारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, जि. गडचिरोली.

श्री. सुरेश बागडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
अरुणा विद्यालय, कोटरा,
ता. कोरची, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२०११)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३८८/२०११ आणि अपील क्रमांक ३८९/२०११ अशी दोन द्वितीय अपीले दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. दोन्ही अपीलांमध्ये जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच आहेत व मागितलेल्या माहितीचा विषय देखील एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची सुनावणी एकत्र घेण्यात आली.

... २

२. अपील क्रमांक ३८८/२०११ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अरुणा विद्यालय, कोटरा, ता. कोरची, जि. गडचिरोली यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन मुख्याध्यापक/संस्था प्रमुख हयांनी अरुणा विद्यालय, कोटरा, ता. कोरची शाळेचा मान्यतेचा प्रस्ताव आपल्या कार्यालयातून अप्रोल कॅम्प, गडचिरोली येथे देण्यात आलेला आहे. जसे वृत्तपत्राची जाहिरात, नियुक्तीचे आदेश, अ, ब, क प्रमाणपत्र इत्यादी दस्तऐवजाचा क प्रस्ताव पाठविला त्याची प्रमाणित प्रत त्यांनी मागितलेली होती.

३. अपील क्रमांक ३८९/२०११ मध्ये देखील अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२०१० रोजी माहितीचा अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अरुणा विद्यालय, कोटरा यांना वर नमुद केलेली माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे दाखल केले होते. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती ही साक्षांकित नाही असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अरुणा विद्यालय, कोटरा यांनी आयोगापुढे सांगितले की, वर नमुद केल्याप्रमाणे दोन्ही अपीलकर्त्याचे माहितीचे अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संस्थाचालकाकडे असल्यामुळे संस्थाचालकांकडून प्राप्त करुन घेऊन दोन्ही अपीलकर्त्यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. सदरची माहिती दोन्ही अपीलकर्त्यानी प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र प्राप्त झालेली माहिती ही साक्षांकित नाही म्हणून ती साक्षांकित करुन मिळावी अशी त्यांनी मागणी केली.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अरुणा विद्यालय, कोटरा ही खाजगी शाळा असून या शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान किंवा वित्तीय सहाय्य नाही. ही शाळा विनाअनुदान तत्वावर कार्यरत आहे. तथापी वरील दोन्ही अपीलकर्त्याना प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळेला आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्याचे सुनावणीत नमुद केले.

६. दोन्ही अपीलकर्ते तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, वरील दोन्ही अपीलकर्त्यांना जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदरची माहिती साक्षांकित करुन दिलेली नाही. म्हणून आयोगासमोर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दोन्ही अपीलकर्त्यांना दिलेली माहिती सहया करुन साक्षांकित करुन दिली. सदरची माहिती दोन्ही अपीलकर्त्यांनी आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्त्यांचे दोन्ही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३८८/२०११ व अपील क्रमांक ३८९/२०११ हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५३९- ५४१/१८.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३९०/२०११.

श्री. प्रेमसिंग भारतसिंग महिले,
उपसभापती,
पंचायत समिती, कारंजा (घाडगे),
जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राजीव जवळेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (विकास - आस्थापना)
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी (प्र),
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २८.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी (प्र) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन शिक्षण सेवेतील शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या सेवाजेष्ठता यादीबाबत व विकल्पाबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मुद्यां क्रमांक १, २ व ४ ची माहिती

... २

उपलब्ध करुन दिली. तथापी मुद्या क्रमांक ३ बाबत विकल्प सादर करण्याचा कालावधी याबाबतची कोणतीही माहिती त्यांना मिळालेली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १७.१२.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलबध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.९.२०१० चा माहितीचा अर्ज दिनांक २९.९.२०१० ला व दिनांक १२.११.२०१० चा पुन्हा दुसरा अर्ज प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने शिक्षण सेवेतील शिक्षण विस्तार अधिकारी यांचेबाबत १ ते ४ मुद्यांवर मोघम स्वरुपाची माहिती मागितलेली होती. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.१०.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ही अत्यंत मोघम स्वरुपाची आहे व आपणास कोणती नेमकी माहिती पाहिजे याचा बोध होत नाही. तरी शासन आदेश/परिपत्रक यांचा क्रमांक, विषय व दिनांक नमूद करावे जेणेकरुन माहिती पुरविणे सोयीचे होईल. तसेच आपण याबाबत दिनांक ११.१०.२०१० रोजी या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून उपलब्ध असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १, २ व ४ ची माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र मुद्या क्रमांक ३ विकल्प सादर करण्याचा कालावधीची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, शिक्षण विस्तार अधिकारी यांना पुढील पदोन्नतीसाठी शिक्षण संवर्गातून महाराष्ट्र विकास सेवा संवर्गात जाण्यासंबंधाने विकल्प केव्हा सादर करावा याबाबतचे शासन निर्णय या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे पुरविता आले नाही. परंतु १ ते ४ मुद्यांवरील माहिती व परिपत्रक अपीलकर्त्यास देण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचे कडून मागितलेल्या माहितीपैकी मुद्या क्रमांक १, २ व ४ ची

माहिती प्राप्त झालेली आहे. मात्र मुद्या क्रमांक ३ बाबत पदोन्नतीसाठी शिक्षण संवर्गातून महाराष्ट्र विकास सेवा संवर्गात जाण्यासंबंधाने विकल्प केंव्हा सादर करावा याबाबतचे शासन निर्णय या कार्यालयात उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, पदोन्नतीसाठी शिक्षण संवर्गातून महाराष्ट्र विकास सेवा संवर्गात जाण्यासंबंधाने विकल्प केव्हा सादर करावा याबाबतचे शासन निर्णय त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५४२- ५४४/२०.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५०/२०११.

श्री. देवेंद्र विजयकुमार गहेरवार,
जुनी वस्ती किल्ला वार्ड,
गुरुदेव चौक, ता. तिरोडा,
जि. गोंदिया - ४४१ ९११. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु त्या दिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सुनावणीची पुढील दिनांक २०.६.२०११ रोजी ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक सुनावणीस गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. ओमप्रकाश गुढे, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री. पी. एन. शर्मा यांनी एकाच वेळेस कनिष्ठ लिपिक या पदाचा पगार घेतला

... २

म्हणून ते सेवेत कार्यरत होते व त्यावेळेला शारिरीक शिक्षणाची पदवी मिळविली. अशा प्रकारे शासनाची दिशाभूल केलेल्या प्रकरणी दिनांक २०.८.२०१० रोजी तक्रार अर्ज केला होता. त्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. मात्र त्यांना अपेक्षित माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ७.१.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. ओमप्रकाश गुढे, उपशिक्षणाधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.११.२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जामध्ये त्यांनी श्री. पी. एन. शर्मा यांनी कनिष्ठ लिपिक पदावर कार्यरत असतांना शारिरीक शिक्षणाची पदवी मिळविली. याबाबत चौकशी करण्याबाबत व सेवानिवृत्तीचे फायदे थांबविण्यासंबंधी कार्यवाही करणेबाबत दिनांक २०.८.२०१० रोजी तक्रार अर्ज दिला होता त्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती.

४. याबाबत श्री. गुढे यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी श्री. पी. एन. शर्मा यांचेबाबत दिनांक २०.८.२०१० रोजी जो तक्रार अर्ज दिला होता. तो तक्रार अर्ज दिनांक २९.१०.२०१० च्या पत्राने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांनी श्री. पी. एन. शर्मा, यांचेकडे पाठवून त्यांच्या त्या तक्रारीतील मुद्यांबाबत त्यांचा खुलासा मागितलेला होता व सदरच्या पत्राने दिनांक १.११.२०१० पुर्वी खुलासा सादर करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांनी श्री. पी. एन. शर्मा यांना दिले होते. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १५.११.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपल्या माहितीचे अधिकारात मागविलेली माहिती दस्ताऐवजाचे स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येत असून त्यासोबत श्री. पी. एन. शर्मा यांना शिक्षणाधिकारी यांनी पाठविलेला दिनांक २९.१०.२०० च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिली. त्यानंतर श्री. पी. एन. शर्मा यांनी दिनांक १.१०.२०१० च्या पत्राने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जाच्या संदर्भात खुलासा सादर केला. मात्र त्यानंतर असा निर्णय घेण्यात

आला की, अपीलकर्त्याच्या दिनांक २०.८.२०१० च्या तक्रार अर्जावर गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तुमसर, जि. भंडारा यांचेकडून चौकशी करावी.  त्यानुसार दिनांक ७.६.२०११ च्या पत्राने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांनी दिनांक ७.६.२०११ च्या पत्राने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तुमसर यांचेकडून चौकशी अहवाल मागविलेला आहे.

५.	म्हणून अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक २०.८.२०१० च्या तक्रार अर्जावर श्री. पी. एन. शर्मा यांनी केलेल्या खुलाश्याची प्रत व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी गटशिक्षणाधिकारी यांना दिनांक ७.६.२०११ च्या पत्राने मागविलेला चौकशी अहवाल याची प्रत आयोगासमोर उपलब्ध करुन दिली.

६.	तथापी प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दिनांक २०.८.२०१० च्या तक्रार अर्जाची चौकशी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तुमसर यांचेकडे देण्यात आलेली आहे म्हणून अपीलकर्त्याच्या दिनांक २०.८.२०१० च्या तक्रार अर्जावर गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तुमसर यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर त्यावर योग्य ती कार्यवाही करुन अपीलकर्त्यास केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.  म्हणून अपीलकर्ताचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अशंत: मंजूर करण्यात येत आहे.
२) अपीलकर्त्याच्या दिनांक २०.८.२०१० च्या तक्रार अर्जावर गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तुमसर यांनी चौकशी केल्यानंतर त्यांचा चौकशी अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यावर योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावा.
३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-		दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३९४/२०११.

श्री. रमेशकुमार मनोहरलाल बाली,
फुटाना ओली, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी, जि. नागपूर.

श्री. सुभाष नेरलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
बाजार निरिक्षक,
नगर परिषद, कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे निवडणूक कामात व्यस्त असल्यामुळे ते गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १२.११.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा बाजार निरिक्षक, मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांचेकडे मुस्ताक मेंबर, नगर परिषद, सदस्य के बडे भाई मुमताज अहमद व. अब्दुल शकुर इनको गांधी चौक में कितने बाय कितनी जमीन दि गई और कब्जा कितने क्षेत्र मे है. उस के पास कितने वृक्ष है. वहॉपर जाने का रास्ता किसने रोख रखा जहा महिलाये पुजा करने जाती थी. याबाबत माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी तथा बाजार निरिक्षक, नगर परिषद, कामठी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १२.११.२०१० चा माहितीचा अर्ज दिनांक १५.११.२०१० रोजी नगरपरिषद कार्यालयात प्राप्त झाला होता आणि सदरचा अर्ज नगरपरिषद कार्यालयातील जनमाहिती यांचेकडे दिनांक १७.११.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने माहिती अर्जात मागितलेली माहिती काढण्यात आली. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा रेकॉर्ड जुने असल्यामुळे रेकॉर्डरुम मध्ये त्या माहितीचा शोध घेण्यात आला. त्यानंतर रेकॉर्डरुममध्ये माहिती उपलब्ध झाली ती माहिती उपलब्ध झाल्या नंतर ती संकलीत करण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २१.१२.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की, मुमताज अहमद व. अब्दुल शकुर यांना जी जमीन दिली आहे त्या जमीनीजवळ एक वडाचे झाड आहे व त्या वडाच्या झाडाला जाणारा रस्ता त्यांनी बद करुन अतिक्रमण केले आहे. म्हणून ते अतिक्रमण काढण्याची कार्यवाही नगर परिषदेने करणे आवश्यक आहे. मात्र त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात अतिक्रमण काढण्याबाबत माहिती मागितलेली नाही. म्हणून अपीलकर्त्याने जी माहिती मागितलेली आहे ती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अतिक्रमण बाबत अपीलकर्त्याने माहिती मागितलेली दिसून येत नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५४८- ५४९/२०.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४०२/२०११.**

श्री. डॉ. निलकंठ उंदरुजी परशुरामकर,
मु. पो. खोडशिवनी, ता. सडक/अर्जुनी,
जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. के. सवाई,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.

श्री. यु. जी. वैद्य,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २५.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन खोडशिवनी येथील स्वस्त धान्य दुकान वाटपाबाबत चौकशी न करता खोटा रिपोर्ट सादर केल्याप्रकरणी व खोडशिवनी गावातील श्री. देऊ अंतू नेवारे यांच्या नावाचे स्वस्त धान्य दुकान गायब केल्याबाबतचा दस्ताऐवज संपूर्ण देण्यात यावा इत्यादी बाबत माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित

... २

मुदतीत जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली. मात्र प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २५.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी जनमाहिती अधिकारी म्हणून श्री. के. बी. मिश्रा हे कार्यरत होते. त्यांनी अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही असे त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या नस्तीवरुन दिसून येते. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया यांचेकडे दिनांक १६.११.२०१० रोजी दाखल केले होते असे विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया यांनी आयोगापुढे सांगितले. तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून श्री. एस. के. जाधव हे कार्यरत होते. त्यांनी या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १३.१२.२०१० रोजी घेतली होती. तथापी प्रथम अपीलाचा निर्णय त्यांनी निर्गमित केलेला दिसून येत नाही असे विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. के. बी. मिश्रा यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक २५.८.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल न घेता ३० दिवसाचे मुदतीत कोणतीही माहिती दिलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकतर्यास माहिती उपलब्ध होण्यास झालेल्या विलंबाबद्यल श्री. के. बी. मिश्रा तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे योग्य होईल. तथापी आजच्या सुनावणीस श्री. के. बी. मिश्रा हे उपस्थित नसल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेण्याची संधी देण्यात येत आहे.

५. तसेच तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन देखील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) प्रमाणे त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसत नाही. म्हणून त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी त्यांना पार पाडली नाही म्हणून श्री. एस. के. जाधव त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबतची पुनर्रावृत्ती करु नये अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

६. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी अपीलकर्त्याच्या दिनांक २५.८.२०१० च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन सदरची माहिती देण्यास विलंब झाला असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती पुरविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २५.८.२०१० च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. के. बी. मिश्रा यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध होण्यास श्री. के. बी. मिश्रा हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये १००००/- शास्तीची कार्यवाही कां करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा अन्यथा शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल.

३) विद्यमान जनमाहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या या आदेशाची प्रत खुलासा करण्यासाठी **श्री. के. बी. मिश्रा तत्कालीन जनमाहिती अधिकारी** यांचेकडे पाठवावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५५०- ५५२/२१.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३९८/२०११.

श्री. डॉ. रविंद्र शामराव वासनिक,
डॉ. आंबेडकर मार्ग, पंजाब नॅशनल बँकेजवळ,
इंदोरा चौक, नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपधर्मदाय आयुक्त, नागपूर.

श्री. उमाठे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
उपधर्मदाय आयुक्त, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, धर्मदाय उपआयुक्त, नागपूर यांचेकडे पिपल्स वेलफेअर संस्थेबाबत एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली असल्याचे तोंडी कबूल केले व अपील मागे घेण्याबाबत कबुल केले आहे व याबाबत कबुली म्हणून रोजनामावर स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ५५३/२१.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४०६/२०११.

श्री. विश्वास अरविंद बागडदेव,
१६७, विश्वास, टिकेकर रोड,
धंतोली, नागपूर - ४४० ०१२. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
कॉंग्रेसनगर, रामकृष्ण मठाजवळ, धंतोली,
नागपूर.

श्री. एम. एस. पटेल,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
त्रिमुर्ती नगर, उपविभाग, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.६.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. जी. एस. राहाटे, सहाय्यक अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, त्रिमुर्तीनगर, उपविभाग, नागपूर

... २

यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मीटरचे नामांतरण करते वेळी कायद्याच्या कोणत्या तरतुदी अंतर्गत महानगरपालिकेची टॅक्स रसीद तसेच नामांतरण इत्तल्ला मागविण्यात येतो. याबाबत शासकीय निर्णय, अध्यादेश, अधिसुचना, शासकीय परिपत्रक इत्यादींची प्रत देण्यात यावी अशी एकूण ८ मुद्यांची माहिती त्यांनी मागितलेली होती. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २४.११.२०१० च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दिनांक १३.१२.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व त्यांचे अपील खारीज केले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही काढण्यात आली. अपीलकर्त्याने एकूण ८ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती मुद्येनिहाय काढण्यात येऊन अपीलकर्त्यास दिनांक २४.११.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्यास दिनांक २४.११.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, मीटरचे नामांतरण करते वेळी अर्जासोबत खरेदी केलेल्या घराचे खरेदीपत्र सादर केल्यानंतर पुन्हा महानगरपालिकेची टॅक्सची पावती जरुरी नाही. कारण खरेदीखत हा पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात यावा. तथापी जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, मिटरचे नामांतरण करणे बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत त्या सुचनांची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली आहे. सदरच्या ए-१ फॉर्ममध्ये नामांतराचे वेळी नगरपालिका टॅक्स पावती जोडणे नमुद केल्याचे असल्यामुळे टॅक्स पावती घेण्यात येत असतात असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, शासनाकडून दिनांक १.७.२००४ च्या परिपत्रक सुचनाप्रमाणे नामांतराचे अर्जबाबत स्टॅम्प पेपर घेण्याबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र त्याप्रमाणे विज मंडळाकडून कार्यवाही करण्यात येत नाही व विज मंडळाकडून रुपये १००/- चा स्टॅम्प पेपर घेण्यात येतो. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, शासनाच्या दिनांक १.७.२००४ च्या परिपत्रकातील सुचनाप्रमाणे स्टॅम्प घेण्याबाबत त्यांचेकडील

... ३

मार्गदर्शक सुचनामध्ये बदल झाला नाही म्हणून त्यांचेकडून रुपये १००/- चा स्टॅम्प घेण्यात येत असतात. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक ६ प्रमाणे आज तारखेस त्या जागेवर राहत असलेल्या मालकाचे नावावर मिटर आहे. म्हणून जुन्याच मालकाचे नावावर त्यांचा मिटर आहे. त्यामध्ये विज मंडळाकडून बदल झालेला नाही. याबाबत जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, घराचे किंवा जागेची विक्री झाल्यानंतर जे जागा मालक किंवा घर मालक नामांतरणासाठी अर्ज करतात त्यांचे नामांतरण बाबत विज मंडळाकडून कार्यवाही होत असते. इतर प्रकरणात विज मंडळ नामांतरणाची कार्यवाही करीत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचेकडील दिनांक ४.११.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २४.११.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु वर नमुद केलेल्या मुद्यांप्रमाणे अपीलकर्त्यास माहिती स्पष्ट कळविणे योग्य होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास खाली नमुद केलेली माहिती विनामुल्य कळवावी.

२) मिटरचे नामांतर करते वेळी ए-१ फॉर्ममध्ये नगरपालिकेची टॅक्स भरण्याबाबतची प्रत जोडणे आवश्यक आहे असे नमुद असल्यामुळे नगरपालिकेच्या टॅक्सची पावती मिटर नामांतरणासाठी जोडणे आवश्यक आहे असे अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळवून ए - १ फॉर्मची झेरॉक्स अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) विज मंडळाला नामांतरण अर्जासोबत जोडावयाचे स्टॅम्प पेपरबाबत शासनाकडून दिनांक १.७.२००४ च्या परिपत्रकातील सुचनाप्रमाणे स्टॅम्प पेपर घेण्याबाबत मार्गदर्शक सुचना नमुद नाही. म्हणून रुपये १००/- चा स्टॅम्प पेपर घेण्यात येत असतात असे स्पष्टपणे कळवावे.

४) घराची खरेदी विक्री झाल्यानंतर मिटर जुन्याच मालकांचे नावावर असतात याबाबत जे ग्राहक मिटर नामांतरणासाठी अर्ज करतात त्यांच्या बाबतच मिटर नामांतराची कार्यवाही होत असते. जे ग्राहक मीटर नामांतरणासाठी अर्ज करीत नाही त्यांचे मिटरचे नामांतरण विज मंडळाकडून स्वतःहुन करण्यात येत नाही असे स्पष्टपणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळवावे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५५४- ५५७/२२.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४७/२०११.

श्री. डॉ. आनंद विनायकराव ढोबळे,
सुब्रत १७१, विवेकानंद नगर, वर्धा रोड,
नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक - १,
सिताबर्डी, नागपूर.

श्री. पी. पी. धरमशी,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सिताबर्डी विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.६.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणीची होऊ शकली नाही म्हणून सदरची सुनावणी दिनांक २२.६.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. बंटेवार, पोलीस उपनिरीक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २३.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज

सादर करुन दिनांक २८.९.२००५ रोजी सिताबर्डी पोलीस स्टेशन येथे जाती व समाजवाचक शिवीगाळ केलेल्या तक्रारीबाबत खासदारावर व त्यांचे पी.ए. व ४ नोकरांवरील केस संदर्भातील व्यक्ती, सीसीटीवही कॅमेरा फित जप्त केली कां व ५ व्यक्तीची बयाणे घेतली का याबाबतची त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ५.१.२०११ च्या पत्राने असे कळविले की, आपल्या माहिती अर्जाची माहिती पोलीस स्टेशन, सिताबर्डी, नागपूर कडून प्राप्त केली असता असे दिसून येते की, अर्जदार आनंद विनायकराव ढोबळे, रा. १७१, विवेकानंद नगर, नागपूर यांनी दिनांक २८.९.२००५ रोजी पोलीस स्टेशन, सिताबर्डीला रिपोर्ट दिली असता त्याबाबत पोलीस स्टेशन सिताबर्डीचे रेकॉर्ड पाहिले असता नमुद तक्रारीबाबत कागदपत्रे उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दिनांक १०.१.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रमांक १, नागपूर शहर यांचेकडे झाली. त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी सिताबर्डी विभाग यांनी संपूर्ण रेकॉर्ड तपासून अर्जदारास पोलीस स्टेशनला त्यांच्या तक्रार संबंधात जी माहिती उपलब्ध असेल ती १५ दिवसांत देण्यात यावी व नसल्यास तसे अर्जदारास कळवावे. असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला. मात्र त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पोलीस स्टेशन, सिताबर्डी यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी दिनांक २४.१२.२०१० रोजी पत्र पाठवून त्यांचेकडून माहिती मागितली. पोलीस स्टेशन सिताबर्डी येथून दिनांक ३.१.२०११ अन्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती प्राप्त झाली व अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ५.१.२०११ च्या पत्राने माहिती पाठविली व त्यामध्ये असे नमुद केले की, अर्जदार श्री. आनंद विनायकराव ढोबळे यांनी दिनांक २८.९.२००५ रोजी पोलीस स्टेशन, सिताबर्डीला रिपोर्ट दिली असता त्याबाबत पोलीस स्टेशन, सिताबर्डीचे रेकार्ड पाहिले असता नमुद तक्रारीबाबत कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दिनांक १०.१.२०११ रोजी पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रमांक - १, सिताबर्डी, नागपूर शहर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सिताबर्डी पोलीस स्टेशन मधील संपूर्ण रेकार्ड तपासण्यात आला तरी देखील माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे दिनांक २०.२.२०११ च्या पत्राने पुन्हा असे कळविण्यात आले की, प्रथम अपीलाचे निर्देशानुसार पोलीस स्टेशन, सिताबर्डी येथे उपलब्ध असलेल्या दिनांक २८.९.२००५ व त्यानंतरच्या क्राईम रेकॉर्डची पाहणी केली असता गुन्हयाची नोंद असल्याचे दिसून आले नाही. तसेच नमुद तक्रारीसंबंधाने कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे अपीलकर्त्यास कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील दिनांक २३.१२.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती दिनांक ५.१.२०११ च्या पत्राने व दिनांक २०.२.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५५८- ५६०/२२.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४११/२०११.**

श्री. सुनिल दुधीराम तलांडे,
क्वा. नं. एफ - ५/११,
मु. पो. उर्जानगर कॉलनी,
चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर.

श्री. वरुणकुमार जनार्धन सहारे,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ८.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री. धकाते यांनी माहितीच्या अधिकाराखाली ज्या सहा प्रकरणाची माहिती मागितली होती त्यापैकी चार प्रकरणाची माहिती यापुर्वीच आपण दिली आहे त्या संदर्भातील माहिती व कार्यकारी दंडाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे देखील झालेल्या जात प्रमाणपत्रा

... २

बाबत व इतर माहिती बाबत असे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ७.१२.२०१० रोजी अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाली. त्यामध्ये असे नमुद केले की, आपणास ज्या माहितीची आवश्यकता आहे त्याबाबत प्रत्यक्ष कार्यालयात येऊन प्रकरणाची पडताळणी करावी व आवश्यक माहितीची मागणी केल्यास तात्काळ पुरविण्यात येईल. आपण मागणी केलेली माहिती कार्यवाही, संकलन, पृथक्करण या स्वरुपाची असून माहितीचा अधिकार अधिनियमान्वये उपलब्ध दस्तऐवताच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्यावयाचे आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. मात्र जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दिनांक १६.१२.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १९.१.२०११ रोजी निर्गमित करण्यात आला व त्या निर्णयात अपीलकर्त्यास ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ८.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे संदर्भात त्यांना निश्चित स्वरुपाचा अर्थबोध होत नव्हता म्हणून त्यांनी दिनांक ७.१२.२०१० रोजी अपीलकतर्यास पत्र पाठवून त्यांचे कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून प्रकरणाची पडताळणी करावी व आवश्यक माहिती घेऊन जावे असे कळविले होते. मात्र अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात हजर झाले नाही. म्हणून त्यांचे कडून त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे तहसीलदार, चंद्रपूर यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने दिनांक ८.११.२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीचे संदर्भात कागदपत्राचे स्वरुपात जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना देणे आवश्यक आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दिनांक १९.१.२०११ च्या प्रथम अपीलात दिलेल्या निर्णयानुसार मुद्येनिहाय माहिती कागदपत्राचे

स्वरुपात अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तथापी ज्यामुद्यांबाबत कागदपत्रे उपलब्ध नाही त्या संबंधात त्या माहितीची वस्तुस्थिती त्यांना कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील एकूण ५ मुद्यांचे संदर्भात आवश्यक ती माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५६१- ५६३/२२.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४१५/२०११.**

श्री. मिलिंद भाऊराव साठे,
२०२, हरी अपार्टमेंट, ११९ साहस कॉलनी,
प्रतापनगर, नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. व्ही. के. जुमळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
डॉ. हरिभाऊ आदमने कला व वाणिज्य महाविद्यालय,
ता. सावनेर, जि. नागपूर.

श्री. ए. के. महंत,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
डॉ. हरिभाऊ आदमने कला व वाणिज्य महाविद्यालय,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १४.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. हरिभाऊ आदमने कला वाणिज्य महाविद्यालय, सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली

अर्ज सादर करुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने दिनांक ६.५.२०१० रोजी अधिव्याख्यातांच्या सेवाजेष्ठते संबंधी दिलेला आदेश त्यानुसार त्यांना सेवाजेष्ठता यादी देण्यात यावी. तसेच महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांचेकडील दिनांक १८.१०.२००१ रोजीचे अद्यादेश आपणास मान्य आहेत काय किंवा कसे याबाबतची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांनी अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १४.७.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १२.८.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली व सदरच्या माहितीमध्ये असे नमुद केले की, आपल्या १४.७.२०१० च्या माहितीचा अधिकार २००५ अन्वये माहिती देण्यासंदर्भात संस्थेच्या अध्यक्षांशी चर्चा केल्यानंतर मला आपणास खालील प्रमाणे कळविण्याचे आदेश झालेले आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे दिनांक ६.५.२०१० चे संदर्भात सेवाजेष्ठते संदर्भात अध्यादेश व परिनियमांची माहिती विद्यापीठाकडून ताबडतोब मागवावी. परिनियमांची अथवा अध्यादेशांची प्रत प्राप्त होताच उपरोक्त बाब महाविद्यालयाच्या स्थानिक प्रबंधन समिती समोर ठेवण्यात येईल व तो निर्णय आपल्याला ताबडतोब कळविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १२.८.२०१० च्या पत्राने कळविल्याचे आयोगासमोर सांगितले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, यापुर्वी महाविद्यालयाने जी सेवाजेष्ठता यादी तयार केलेली आहे त्याबाबत त्यांनी विद्यापीठाकडे आक्षेप नोंदविला होता. तो आक्षेप विचारात घेऊन नवीन यादी तयार करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे ती सेवाजेष्ठता यादी तयार करुन त्याची प्रत त्यांना उपलब्ध व्हावी असे त्यांचे म्हणणे आहे. याबाबत जनमाहिती अधिकारी आणि प्राचार्य यांनी आयोगाकडे असे स्पष्ट केले की, विद्यापीठाची सुचना लक्षात घेऊन सेवाजेष्ठता यादी तयार करण्याची कार्यवाही अद्याप पूर्ण झाली नाही. त्यामुळे सुधारित सेवाजेष्ठता यादी सद्य:स्थितीत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येत नाही ही बाब लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकर्त्यास सद्य:स्थितीची सेवाजेष्ठतेची माहिती उपलब्ध करुन देणे न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येते.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी डॉ. हरिभाऊ आदमने कला व वाणिज्य महाविद्यालय, सावनेर यांनी अपीलकर्त्यास विद्यापीठाचे आदेशाप्रमाणे सुधारित सेवाजेष्ठता यादी तयार करण्याचे काम अद्याप पुर्ण झाले नाही. त्यामुळे सुधारित सेवाजेष्ठता यादी सद्यःस्थितीत उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र सुधारित सेवाजेष्ठता यादी तयार झाल्यानंतर अपीलकर्त्यास ती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे विनामुल्य कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४१७/२०११.**

श्री. भय्या भदुजी तलमले,
प्लॉट नं. ६, प्रगतीनगर,
मेडीकल कॉलनी जवळ,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एच. के. रणदिवे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
ग्रामीण विभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
विद्युत भवन. तळ मजला, काटोल रोड, नागपूर - ४४० ०१३.

श्री. पी. डी. पराते,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
ता. कुही, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १९.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण विभाग, (कृती व परिरक्षण उपविभाग) कुही यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री. दर्शन भदुती तलमले, मु. मांढळ, ता. कुही यांना शेतात लाईन

... २

देतांना सादर केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती मिळावी व माहिती ज्या संदर्भात पाहिजे आहे त्या संदर्भात ग्राहक क्रमांक एजी-१९२८ कनेक्शन नं. ४१५०९०३१९८६३, दिनांक ४.१०.२००३ याबाबत सत्यप्रत मागितली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २१.८.२०१० व दिनांक २७.८.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध नाही असे त्यांना कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १०.१०.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकतर्याचा दिनांक १९.७.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २६.७.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन २००३ या कालावधीतील होती. सदरची माहिती ही सुमारे ७ वर्षापुर्वीची असल्यामुळे त्या माहितीचा कार्यालयात शोध घेण्यात आला. परंतु शोध घेऊनही अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक २१.८.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपण ग्राहक क्रमांक ४१५०९०३१९८६३/ एजी १९२८ या ग्राहकाला दिनांक ४.१०.२००३ रोजी दिलेल्या विद्युत पुरवठयाच्या कागदपत्राची झेरॉक्स प्रत मागितलेली होती. हा विद्युत पुरवठा ७ वर्ष जुना आहे. कागदपत्राचा शोध सुरु आहे. कागदपत्र उपलब्ध झाल्यानंतर आपणास पत्राद्वारे कळविण्यात येईल असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले. त्यानंतर पुन्हा अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. तथापी सदरची कागदपत्रे उपलब्ध झाले नाही म्हणून अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक २७.८.२०१० च्या पत्राने आपण मागितलेल्या माहितीचा शोध घेऊनही उपलब्ध होत नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. सदरच्या दिनांक २१.८.२०१० चे पत्र व दिनांक २७.८.२०१० चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगाकडे मान्य केले. मात्र दिनांक २१.८.२०१० चे पत्र त्यांना प्रत्यक्ष त्यांचे कार्यालयात गेल्यानंतर विलंबाने दिनांक १४.९.२०१० रोजी देण्यात आल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सदरचे पत्र पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास पाठविले होते.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्याने प्रथम अपील अधिक्षक अभियंता यांचेकडे पाठविले होते. तथापी या प्रकरणात कार्यकारी अभियंता हे प्रथम अपीलीय

अधिकारी आहेत. म्हणून कार्यकारी अभियंता यांनी प्रथम अपीलाचे संदर्भात जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध नाही असे कळविले असल्याचे त्यांना दिसून आले म्हणून कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २९.१०.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध नसल्यामुळे आपणास माहिती देता येत नाही असे कळविले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने त्यांना मागितलेली माहिती ही सुमारे ७ वर्षापुर्वीची आहे. जनमाहिती अधिकारी यांनी सदरच्या माहितीचा शोध घेऊनही सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही व म्हणून माहिती उपलब्ध होत नाही हे स्पष्ट जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २१.८.२०१० व दिनांक २७.८.२०१० च्या पत्राने कळविले असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

६. मात्र अपीलकर्त्याचे प्रस्तुत प्रकरणात असे म्हणणे आहे की, त्यांचा भाऊ श्री. दर्शन भदुजी तलमले यांना त्यांचे शेतीच्या एकत्रित गट नंबर वर नाहरकत न घेता विज मंडळाने श्री. दर्शन भदुजी तलमले यांना विज पुरवठा दिला आहे. त्याबाबतची चौकशी करावी अशी त्यांची प्रामुख्याची मागणी आहे. म्हणून यासाठी अपीलकर्त्याने वीज मंडळाचे सक्षम अधिकाऱ्यांकडे याबाबत दाद मागणी योग्य होईल. तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नसल्याबाबत कळविले असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येते.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५६७- ५६९/२३.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४१८/२०११.

श्री. यशवंत भदुजी मेश्राम,
द्वारा - जनाबाई बोरकर, सिरसपेठ, उमरेड रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. यु. काळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मंडळ अधिकारी, मु. पो. शंकरपूर, ता. चिमूर,
जि. चंद्रपूर.

श्री. व्ही. सी. जेनेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी, सा. क्र. २३, मु. पो. साठगांव, ता. चिमूर,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, साठगांव, ता.चिमूर यांचेकडे गट क्रमांक ३४ बाबतची एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून संपूर्ण माहिती मिळाली त्यामुळे अपील मागे घेत आहे असे सांगून रोजनामावर अपीलकर्त्याने स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५७०/२३.६.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१५/२०११.**

श्री. संजय मुरारी रामटेके,
जटपुरा वार्ड नं. २,
समता विकास मंडळाजवळ,
चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भुमी अभिलेख, चंद्रपूर.

श्री. एस. जे. गौरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, ता. जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.५.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही म्हणून सदरची सुनावणी दिनांक २८.६.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या पदाचा पदभारही जनमाहिती अधिकारी त्यांचेकडेच आहे.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २०.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जात त्यांनी मौजा चंद्रपूर नझुल मोहल्ला जटपूरा नं. २, शिट

... २

नं. ५९ आखिव पत्रिका नं. ७९९०, प्लॉट नं. ९९/४ या प्लॉटची विक्री किंवा कोणत्या फेरफार क्रमांक ८४८, दिनांक २३.८.२००५ घेण्यात आला असून सौ. रंजना सुरेश कातकर, चंद्रपूर यांचे नांव आखीव पत्रिकेवर दर्ज झाले याबाबतची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ९.९.२०१० च्या पत्राने कागदपत्राचे शुल्क फी रुपये २००/- भरण्याबाबत कळविले. त्यानुसार अपीलकर्त्याने दिनांक १७.९.२०१० रोजी माहितीचे शुल्क भरणा केला व अपीलकर्त्यास दिनांक १७.९.२०१० रोजी त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यास दिनांक १७.९.२०१० राजी जी माहिती दिली त्यामध्ये फेरफार क्रमांक ८४८, दिनांक २३.८.२००५ मध्ये घेण्यात आलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की, सदरच्या फेरफारामध्ये सौ. रंजना सुरेश कातकर यांचे नाव आखीव पत्रिकेवर कोणत्या कागदपत्राचे आधारे लावण्यात आले आहे ती कागदपत्रे त्यांना मिळालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या आखिवपत्रिकेवर सौ. रंजना सुरेश कातकर यांचे नांव लावण्यात आलेले आहे. परंतु ते नांव ज्या कागदपत्राचे आधारावर लावण्यात आलेले आहे ती कोणतीही कागदपत्रे त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. सदरची नोंदणी तत्कालीन नझुल सर्वेअर श्री. वासेकर यांनी लावलेली आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१.२०११ च्या पत्राने श्री. वासेकर यांना पत्र लिहून असे विचारले आहे की, आपल्याकडे जटपूरा नं. २ चा कार्यभार २००५ या कालावधीत होता. त्यामुळे फेरफार क्रमांक ८४८, दिनांक २३.८.२००५ चा फेरफार हा आपल्या काळात घेण्यात आला आहे तो कशाचे आधारे करण्यात आला व आखिवपत्रिकेत नोंद कशाचे आधारे घेतली असा खुलासा त्यांचेकडून मागितलेला आहे. मात्र अद्याप पर्यंत खुलासा आलेला नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, फेरफार क्रमांक ८४८, दिनांक २३.८.२००५ ला घेण्यात आलेले आहे व त्यामध्ये सौ. रंजना सुरेश कातकर यांचे नांव लावण्यात आलेले आहे. मात्र त्या संबंधितचे कोणतेही कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास

जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. त्याचप्रमाणे कोणतीही कागदपत्रे नसतांना तत्कालीन नझुल सर्वेअर श्री. वासेकर यांनी आखीव पत्रिकेत सौ. रंजना सुरेश कातकर यांचे नांव चुकीचे लावलेले दिसते. म्हणून त्याबाबत त्यांचा खुलासा मागवून त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक हाईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, फेरफार क्रमांक ८४८, दिनांक २३.८.२००५ रोजी घेण्यात आला व त्यामध्ये सौ. रंजना सुरेश कातकर यांचे नावं लावण्यात आले. मात्र ते कशाचे आधारे लावण्यात आले त्याची कोणतीही कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे तसेच सौ. रंजना सुरेश कातकर यांचे नांव कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही करावी याची देखील माहिती अपीलकर्त्यास कळवावी.

२) तत्कालीन नझुल सर्वेअर श्री. वासेकर यांनी फेरफार क्रमांक ८४८, दिनांक २३.८.२००५ रोजी घेतला व सौ. रंजना सुरेश कातकर यांचे नाव फेरफारमध्ये लावण्यात आले. मात्र हा फेरफार कोणत्या आधारे घेण्यात आला याची कोणतीही कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाही म्हणून याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचा खुलासा मागवून त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रस्ताव वरिष्ठांकडे हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांत पाठवावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५७१- ५७३/२८.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४२४/२०११.

श्री. पॅंथर प्रकाश बन्सोड
१८०, ऊंटखाना, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र-कुलगुरु,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

श्रीमती जयश्री हि. वैद्य,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
परिक्षा नियंत्रक,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२०१० रोजी मुख्य राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन विद्यापीठाच्या शिक्षण विभागांतर्गत दिनांक १ मार्च २००२ ते माहिती पुरवेपर्यंतच्या कालावधीची माहिती शिक्षण या विषय/विभागांतर्गत पी.एच.डी.संशोधनासाठी सादर केलेल्या Synopsis पैकी मंजूर करण्यात

... २

आलेल्या विद्यार्थ्यांची नांवे, शोध प्रबंधकांचे शिर्षक व संशोधकाचे नावाची यादी, शोध प्रबंधाचे शिर्षक, मार्गदर्शकाचे नाव, सभेची तारीख, सभेच्या मिनिट्स व प्रोसीडींगची सत्यप्रती इत्यादी माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्र-कुलगुरु यांचेकडे दिनांक १९.१२.२००८ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.१.२००९ रोजी देण्यात आला असून त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे म्हटले की, कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाची ही माहिती असल्यामुळे त्रसस्थ पक्षाचे अभिप्राय घेऊन अपीलकर्त्यास माहिती पुरवावी. तथापी अद्याप त्यांना कोणतीही अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले व जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून त्यांचेवर कार्यवाही करावी असे नमुद केले.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १६.९.२००८ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १७.९.२००८ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे अर्जात माहिती कोणत्या तारखेपर्यंत द्यावी हे नमुद नसल्यामुळे अपीलकर्त्यास दिनांक १५.१०.२००८ च्या पत्राने कालावधीची मागणी केली. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने दिनांक २४.१०.२००८ च्या पत्राने त्यांनी मागितलेली माहिती दिनांक १ मार्च २००२ ते दिनांक १५.१०.२००८ या कालावधीची देण्यात यावी असे त्यांनी कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने सर्व संबंधित त्रयस्थ पक्षास पत्र पाठवून त्यांची माहिती देण्याबाबत अभिप्राय मागविले. सदरचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर दिनांक ३.६.२००९ च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की, शिक्षण विषयाच्या ६८ संशोधकांना त्यांची माहिती देण्याबाबत विचारणा केली असता २३ संशोधकांनी पत्राला उत्तर दिले व त्यात २२ संशोधकांनी माहिती देण्यात येऊ नये असे पत्रात नमुद केले व एका संशोधकाने माहिती देण्यास संमती दिली म्हणून अपीलकर्त्यास एका संशोधकाची माहिती दिनांक ३.६.२००९ च्या पत्राने पाठविली. मात्र ज्या संशोधकांनी कोणत्याही प्रकारचे उत्तर दिले नाही त्याबाबत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी काहीही कळविलेले दिसून येत नाही.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दिनांक १६.९.२००८ च्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३.६.२००९ च्या पत्राने अपीलकर्त्यास एका संशोधकाची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. मात्र बाकी संशोधकांची कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही.

... ३

५. वास्तविक पाहता माहिती अधिकारान्वये विद्यापीठात संशोधनासाठी काम करीत असलेल्या सर्वांची माहिती अपीलकर्त्यास मुदतीच्या आत उपलब्ध करुन देणे शक्य आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती संपूर्ण माहिती अद्यापही उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्याचे विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस कां करु नये याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे कडील दिनांक १६.९.२००८ च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.९.२००८ च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसाच्या आत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहिती उपलब्ध होण्याचे विलंबास ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये त्यांना लागू असलेल्या सेवा नियमान्वये शिंस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस कां करण्यात येऊ नये याचा खुलासा हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा.
३) सदरच्या निर्णयाची एक प्रत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी.
४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५७४- ५७६/२८.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४२०/२०११.

श्री. अरविंद तुलाराम लोधी,
वार्ड नं. २, सिव्हील लाईन, ता. सावनेर, जि. नागपूर - ४४१ १०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी,
नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

श्री. सुमंत गणपतराव मोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा प्रकल्प अधिकारी, लोकल फंड, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, लोकल फंड, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे दिनांक २६.१०.२०१० रोजी केलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली त्याबाबतची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना माहिती संपूर्ण मिळाली. त्यांचे समाधान झाले त्यामुळे अपील चालवावयाचे नाही. अपील मागे घेतले. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/५७७/२८.६.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४२५/२०११ व अपील क्रमांक ४२६/२०११.

श्री. प्रकाश दगडू भारंबे
द्वारा - किशोर मुंजनकर,
७-ए, साटोने ले आऊट, गिताईनगर,
धुनीवाले मठासमोर, वर्धा - ४४२ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव (पदुम)
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव (पदुम),
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.६.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.३.२०११ व दिनांक १०.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वर नमुद केलेले अपील क्रमांक ४२५/२०११ आणि अपील क्रमांक ४२६/२०११ ही दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत. मात्र उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ५.१०.२०१० रोजी व दिनांक ४.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदुम), पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय

... २

विकास विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली दोन अर्ज सादर करुन दुग्धव्यवसाय विभागातील महाव्यवस्थापक, इत्यादी सामान्य राज्य सेवा गट-अ(कनिष्ठ) पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ७ उमेदवारांपैकी ४ उमेदवारांनी अनुभवाची खोटी प्रमाणपत्रे सादर करुन शासनाची फसवणूक केल्याबाबत व त्यापैकी २ अपात्र उमेदवारांची नियुक्ती झाल्यामुळे त्यावर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणेसाठी मा. मंत्री महोदय, डॉ. नितीन राऊत यांनी दिनांक ७.८.२०१० रोजी अहवाल मागवून तो तात्काळ सादर करणेबाबत सचिव (पदुम) यांना दिलेल्या पत्रावर केलेल्या सर्व कार्यवाहीची कागदपत्रे मागितलेली होती. तथापी त्यांना कोणतीच माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १८.१.२०११ व दिनांक १७.१.२०११ रोजी दोन प्रथम अपील उपसचिव (पदुम), पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी झाली नाही व त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदुम) व प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (पदुम) मंत्रालय विस्तार, मुंबई हे सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. मात्र त्यांनी दिनांक २७.६.२०११ रोजी आयोगाचे कार्यालयाकडे फॅक्स पाठवून सदरची सुनावणी दिनांक १८.७.२०११ रोजी ठेवण्याबाबत विनंती केलेली होती. तथापी सदरच्या सुनावणीसाठी प्रतिनिधी पाठवावे असे आयोगामार्फत त्यांना दुरध्वनीद्वारे कळविण्यात आले होते. मात्र त्यांचा कोणताही प्रतिनिधी आजच्या सुनावणीस हजर झालेला नाही. म्हणून त्यांचे याबाबत कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

४. अपीलकर्त्याने सादर केलेल्या अपील अर्जावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचेकडील दिनांक ५.१०.२०१० चा व दिनांक ४.१०.२०१० चा माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १५.१०.२०१० च्या पत्राने असे कळविलेले दिसून येते की, सदर नस्तीवर कार्यवाही सुरु असल्याने नस्ती इतर विभागांच्या अभिप्रायासाठी सादर झालेली असल्याने सदर कागदपत्रे आपणास उपलब्ध करुन देता येणार

... ३

नाही. त्या नस्तीवर अंतिम निर्णय झाल्यानंतर त्याबाबतची माहिती आपणास देण्यात येईल. म्हणून सदरच्या नस्तीवर अंतिम निर्णय झाला असल्यास त्याबाबतची कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे वरील दोन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत आहेत.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४२५/२०११ आणि अपील क्रमांक ४२६/२०११ ही दोन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्तीवर अंतिम निर्णय झाला असल्यास अपीलकर्त्याच्या दिनांक ५.१०.२०१० आणि दिनांक ४.१०.२०१० च्या माहिती अर्जातील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तथापी अंतिम निर्णय झाला नसल्यास त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळवावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४३१/२०११.**

श्री. चंद्रशेखर ब्रिजबहाददुर यादव,
हनुमाननगर, तुकुम, नागापूरे आटा चक्कीजवळ,
चर्च रोड, चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक-२,
नागपूर.

श्री. अनील काळे,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. भूषण चंदिले, जनसंपर्क अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या

... २

अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अद्याप पर्यंत त्यांना कां मिळाले नाही याबाबतची त्यांनी माहिती मागितलेली होती तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी संबंधाने शासन निर्णयाची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी तयांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २.९.२०१० च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय समाज कल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे दिनांक २७.९.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.१०.२०१० रोजी निर्गमित करण्यात आला व त्यामध्ये अपीलकर्त्याचा जातीचा दावा मान्य/अमान्य करण्यासाठी प्रकरण १ महिन्याचे कालावधीत समितीपुढे निर्णयासाठी ठेवावे असा निर्णय दिला. मात्र त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दिनांक २.९.२०१० रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्या माहितीने अपीलकत्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा जातीचा दावा मान्य/अमान्य करण्यासाठी प्रकरण १ महिन्याचे कालावधीत समितीपुढे निर्णयासाठी ठेवावे असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला. म्हणून अपीलकर्त्याचा जातीचा दावा समितीसमोर ठेवण्यात आला. सदर समितीने अपीलकर्त्याच्या जातीच्या दाव्याची कागदपत्रांची पडताळणी करुन अपीलकर्त्याचा जातीचा दावा अमान्य करण्याचा निर्णय दिनांक १६.६.२०११ रोजी समितीने घेतला. त्या निर्णयाची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. तसेच त्या सोबत असलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या देखील प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्या. सदरची माहिती अपीलकर्त्याने स्विकृत केली.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४०१/२०११.

श्रीमती डॉ. सिमा डब्ल्यू. गेडाम,
द्वारा - एस. के. बॅनर्जी, प्लॉट नं. ९,
संत ज्ञानेश्वर कॉलनी, मानकापूर रिंग रोड,
नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त,
परिमंडळ-२, सिव्हील लाईन,
नागपूर.

श्री. थोरात,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सदर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ३.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.५.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी अपीलकर्ती यांनी सुनावणीची पुढील तारीख मागितली म्हणून प्रस्तुत प्रकरणी सुनावणी ही दिनांक ३०.६.२०११ रोजी ठेवण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. आर. डी. कोकाटे, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.१०.२०१० रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन महानगरपालिका, नागपूर यांचेकडील दिनांक १८.१२.२०१० च्या पत्राने प्रवर्तन अधिक्षक, प्रवर्तन विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी श्री. कामराज जांभुळकर आणि भाऊ यांचे अनाधिकृत बांधकाम तोडण्याबाबत पोलीस बंदोबस्त मिळण्याबाबत पत्र व्यवहार केलेला आहे त्यावर काय कार्यवाही झाली याची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना कोणतीही माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२, नागपूर यांचेकडे दिनांक ३.२.२०११ रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास त्यांना कोणतीही माहिती देता आली नाही. तथापी अपीलकर्त्याने आयोगासमोर त्यांचेकडील दिनांक ११.१०.२०१० चा अर्ज सादर केला. सदरचा माहितीचा अर्ज हा विहित नमुन्यात केलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्त्याला महानगरपालिकेच्या प्रवर्तन अधिक्षकांनी दिनांक १८.१२.२०१० रोजी पोलीस बंदोबस्त पुरविण्यासाठी दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही केली याची माहिती त्यांना पाहिजे असल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास आयोगासमोर त्यांचेकडील दिनांक ११.१०.२०१० च्या अर्जाची प्रत व त्यासोबत महानगरपालिका प्रवर्तन अधिक्षक यांचे कडील दिनांक १८.१२.२०१० च्या पत्राची प्रत तसेच दिनांक ३.१२.२०१० च्या पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिली. ती जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्विकृत केली म्हणून प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर यांनी अपीलकर्त्यास प्रवर्तन अधिक्षक, प्रवर्तन विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडील दिनांक १८.१२.२०१० च्या पत्रावर व दिनांक ३.१२.२०१० च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर यांनी अपीलकर्त्याचा दिनांक ११.१०.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रवर्तन अधिक्षक, महानगरपालिका, नागपूर यांचेकडील दिनांक १८.१२.२०१० च्या व दिनांक ३.१२.२०१० च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४३६/२०११.

श्री. अनुराज राजकुमार सरोजकर,
मु. पो. गणखैरा, ता. गोरेगांव,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोरेगांव,
जि. गोंदिया.

श्रीमती एस. एस. पाझारे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेविका,
ग्रामपंचायत, गणखैरा, ता. गोरेगांव,
जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. व्ही. डी. मरसकोल्हे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २८.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, गणखैरा, ता. गोरेगांव, जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत गणखैरा या ग्रामपंचायतीबाबत सन २००८ ते २०१० या कालावधीत केलेली

... २

विकास कामे व त्यावरील खर्च याबाबत एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र ग्रामीण पाणी पुरवठा समिती अंतर्गत विहिर खोदकाम व साहित्यावर जे ४ लाख रुपये खर्च करण्यात आले त्या खर्चाची बिले अद्याप मिळालेली नाही. त्याचप्रमाणे १,९०,०००/- रुपये ग्रामीण पाणी पुरवठा अंतर्गत खर्चाची बिले देखील त्यांना मिळालेली नाही व ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या शासन निर्णयाची प्रत त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, गोरेगांव, जि. गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सचिव यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यांचा दिनांक २८.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्त्यास दिनांक २७.१.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोागापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र वर नमुद केल्याप्रमाणे रुपये ४ लाख व रुपये १ लाख ९० हजार या खर्चाची बिले त्यांना मिळाली नाही व शासन निर्णयाची प्रत देखील त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसचिव यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ग्रामीण पाणी पुरवठा योजना अंतर्गत करण्यात येणारा खर्च हो ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचे अध्यक्ष व सचिव यांचेकडून होत असतो. त्यांचेकडे या खर्चाची बिले मागितले असता त्या समितीने संबंधित ठेकेदारास अदा करण्यात आलेले रुपये ४ लाखाची बिले व रुपये १ लाख ९० हजाराची बिले त्यांचेकडून त्यांना प्राप्त झाली व सदरच्या बिलाच्या झेरॉक्स प्रती त्यांनी आयोगासमोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्या त्या प्रती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केल्या. त्याचप्रमाणे अपीलकर्त्यास ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या शासन निर्णयाची प्रत देखील आयोगासमोर उपलब्ध करुन दिली.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४३३/२०११.**

श्री. परमेश्वर शिवशंकर देशमुख,
बुंटी विद्यालय, गोबरवाही,
ता. तुमसर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्रीमती सुषमा एस. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
बुटी विद्यालय, खमारी (बुटी), पो. माटोरा,
ता. जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.६.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.६.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. जी. येरणे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३०.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, बुटी विद्यालय, खमारी बुटी, ता.जि.भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन २००४ ते सन २०१० पर्यंत भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक ४५०५ मध्ये रक्कम कपात

होत आहे तरी भविष्य निर्वाह निधी कडून मला माझी रशिद कां मिळवून देण्यात आली नाही याची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ४.२.२०११ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे दाखल केली. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अपीलकर्त्याचा दिनांक ३०.१२.२०१० चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला नाही. मात्र आयोगाकडील अपील अर्जाचे संबंधात त्यांना नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्या नोटीस बरोबर अपीलकर्त्याचा अर्ज प्राप्त झाला. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, भंडारा यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांचेशी पत्र व्यवहार करुन त्यांचेकडून सन २००४ ते २०१० पर्यंत भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक ४५०५ च्या स्लीप प्राप्त करुन घेतल्या. सदरच्या भविष्य निर्वाह निधी स्लीप अपीलकर्त्यास पाठविल्या. मात्र अपीलकर्त्याने त्या स्विकारल्या नाही म्हणून अपीलकर्त्यास त्या स्लीप देता आल्या नाही. तथापी याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना सदरच्या स्लिप मिळण्यास विलंब झाला होता. म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. म्हणून हया भविष्य निर्वाह निधी स्लीप त्यांनी स्विकारल्या नाही. तथापी आज आायोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सन २००४ ते २०१० या कालावधीच्या भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक ४५०५ च्या स्लीप उपलब्ध करुन दिल्या. सदरच्या भविष्य निर्वाह निधी स्लीप अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केल्या.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, भंडारा यांचेकडे असल्यामुळे त्यांचेकडून जनमाहिती अधिकारी यांनी भविष्य निर्वाह निधीच्या स्लीप प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिल्या असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येते.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**